*कष्टकरी जनता, भूषण भारता । वंदन करितो पददलिता ।।*

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक**

**संपादक**
**रामचंद्र मुटाटकर**

# हाकारा (त्रैमासिक)

**कार्यकारी संपादक**
**ग. शां. पंडित**

**वर्ष : ३० वे** **जुलै-सप्टेंबर २००९** **अंक : तिसरा**

# अनुक्रमणिका

संपादकीय ---------------------------------------------- २

१) जंगलातील जमीन आणि वनहक्क नोंदणी कायदा - ॲड. सुरेखा दळवी ---------- ३

२) आदिवासी आणि आरोग्याचे प्रश्न - डॉ. सराफ ----------------------- ११

३) आदिवासी आणि पर्यावरण - श्री. मोहन हिराबाई हिरालाल ---------------- १७

४) जैवसंरक्षणाविषयी कायद्यांची थोडक्यात माहिती ----------------------- ३१
जैवविविधता कायदा २००२ व जैवविविधता नियम २००४

५) जैवविविधता व्यवस्थापन समिती -------------------------------- ३८
वास्तव आणि प्रश्न

६) आदिवासी एक निसर्गमय मानव - डॉ. मोतीराम रावजी देशमुख -------------- ४५

◆ **पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.
दूरध्वनी : (०२०)२५८९७२९८

◆ **अक्षर जुळणी**
नंदू हि. दिघे

◆ **मुद्रण स्थळ**
ओम एंटरप्राईजेस, पुणे

◆ **मुद्रक व प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
अध्यक्ष, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

◆ **मुखपृष्ठ**
'मंथन' चर्चासत्रातील छायाचित्रे

**अंक मूल्य ४०/- रूपये**

**या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.**

या अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने अनुदान दिले असले तरी अंकात व्यक्त झालेल्या
लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय

'हाकारा'चा हा 'मंथन' विशेषांक आपल्या हाती देताना आनंद होत आहे. सामाजिक व साहित्य विश्वातील थोर विचारवंत म्हणून ख्याती असलेले प्रा. गं. बा. सरदार उर्फ अण्ण आमच्या महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे अध्यक्ष म्हणून काही काळ लाभले, एवढेच नव्हे तर, 'हाकारा'च्या निर्मितीमध्येही त्यांचे मोठे योगदान आहे. अशा या द्रष्ट्या व्यक्तिमत्त्वाचे हे जन्मशताब्दी वर्ष. परिषदेचे अध्यक्ष असताना अण्णांनी जंगल, जमीन, पर्यावरण, आदिवासी विकास आदी विषयांवरील अनेक चर्चासत्रांमध्ये हिरीरीने सहभाग घेतला. मार्गदर्शन केले.

आजच्या बदलत्या परिस्थितीत आदिवासींच्या प्रश्नांवर, महत्त्वाच्या विषयांवर चर्चा व्हावी, विचार व्हावा व त्यातून काही ठोस कृती कार्यक्रम आखले जावेत, की ज्यामुळे स्वयंसेवी संस्थांना, कार्यकर्त्यांना ते मार्गदर्शक ठरतील, म्हणून अण्णांच्या जन्मशताब्दीचे निमित्त साधून त्यांना यानिमित्ताने आदरांजली म्हणून महाराष्ट्रातील आदिवासींमध्ये कार्यरत असणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांचे एक चर्चासत्र भारतीय ॲग्रो इंडस्ट्रीज (बाएफ) विकास अनुसंधान प्रतिष्ठान यांच्या सहकार्याने परिषदेने 'मंथन' नावाने पुणे येथे दिनांक ८ व ९ ऑगस्ट २००९ रोजी आयोजित केले होते.

या दोन दिवसांच्या चर्चासत्रात आदिवासी क्षेत्रांत काम करणाऱ्या अनेक मान्यवर कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला व आपले विचार परखडपणे मांडले. प्रामुख्याने जंगल जमीन व वनहक्क नोंदणी कायदा (ॲड सुरेखा दळवी), आदिवासी व पर्यावरण (श्री. मोहन हिराबाई हिरालाल), शेती आणि विकास (श्री. गिरीश सोहोनी), आदिवासी आणि आरोग्याचे प्रश्न (डॉ. अनिल सराफ), आदी विषयांवर मान्यवरांनी आपले विचार मांडले. यापैकी तीन मान्यवरांचे विचार लेख स्वरुपात या अंकात प्रकाशित करीत आहोत. 'शेती आणि विकास' या विषयावरील टिपण उपलब्ध होऊ शकले नाही. त्यामुळे ते येथे देता आले नाही; त्याबद्दल दिलगीर आहोत.

एकंदरीत या अंकाविषयीच्या आपल्या प्रतिक्रिया / अभिप्राय कळवावेत, ही विनंती.

ग. शां. पंडित
कार्यकारी संपादक

# जंगलातील जमीन आणि वनहक्क नोंदणी कायदा

ॲड. सुरेखा दळवी

***अण्णांच्या म्हणजे गं. बा. सरदारांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने पुन्हा एकदा एक वेगळं विचार-मंथन येथे होतंय. मी पहिल्या शिबिरापासून यांच्याशी (मासशी) जोडली गेली आहे. अण्णांशी मी वेगळ्या प्रकारे जोडली गेली आहे. वसुधा आणि अजितबरोबर दुसरं घर म्हणजे अण्णांचं होतं. अण्णांशी वेगवेगळ्या विषयांवर चर्चा होत होत्या. जव्हारला गेलं की मुकण्यांचा वाडा जसा बघायचा तसा सरदारांचा वाडा पण शोधायचा, हे आम्हाला इतकं जव्हारबद्दल ऐकून माहीत झालं होतं. अण्णांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने मागे वळून बघताना गेल्या ३० वर्षांत जे काय बदल झालेत ते संदर्भ लक्षात ठेवून मांडण्याचा हा प्रयत्न.***

२५ वर्षे हा काही फार मोठा कालावधी नाही. विशेषत: आदिवासींच्याबाबत बोलायचं झालं तर त्यांना भेडसावणारी सर्वात मोठी समस्या म्हणजे जंगलचा राजा, जंगलातच चोर ठरतो. जंगलचा राजा जंगलावर आपले हक्क सांगू शकत नाही. यांचे वेगवेगळे अनुभव आल्यानंतर जुने वाचलेलं एक पुस्तक महाश्वेता देवींचं - 'अरण्येर अधिकार'. त्यात पहिल्यापासून शेवटपर्यंत म्हणजे ९ जून १९०० असा पहिला शब्द आहे. बिरसा मुंडापासून, तंट्या - भिल्लापर्यंत वाचताना, आदिवासींचं त्यांचं स्वप्न होतं- 'आपल्या मायला अख्या चावलचा मीठ घातलेला भात खायला घालायचा'. म्हणजे किती साधं स्वप्न; पण त्यासाठी प्रशासन त्यांच्याशी कसं वागलं. प्रशासनाने त्या आदिवासींना कसं मोडून काढलं, त्यांचे हक्क कसे नाकारले, ती दमण शक्ती, ते शोषण, ती चळवळ-अत्याचार आज स्वातंत्र्यानंतरही ६० वर्षे झाली तरी त्यांची काही प्रमाणात तिची धार कमी झाली असली तरी तेच राहिलं आहे. आम्ही जेव्हा आमच्या कामाचं Documentation करायला जातो, तेव्हा तेच लिहितो का काय ? एवढं साम्य त्या कादंबरीत आणि आजच्या वास्तवात आहे, हे मुद्दामहून मला नमूद करायचं आहे.

आदिवासी आणि जंगलाचा संबंध म्हणजे फक्त त्या झाडाचा नाही तर त्या भूमीचा आहे. जमीन आणि जंगल कायदा या अनुषंगाने जंगलातील जमीन आणि वनहक्क नोंदणी कायदा त्यासंदर्भात मी मांडणी करायचा प्रयत्न करते आहे.

या कायद्याची पार्श्वभूमी म्हणजे 'अरण्येर... वाचताना बिरसा मुंडापासून तंट्या-भिल्लापर्यंतचे लढे कधी नोंदले गेलेच नाहीत. त्या लढ्याचा संदर्भ घेतच याच्याकडे बघावं लागेल. ६० किंवा ७० नंतर जंगलावर शेती करणाऱ्याला गुन्हेगार, अतिक्रमणदार ठरवून हुसकून लावणे आणि पिकांची नासधूस करणे याच्याविरुद्ध जे लढे उभारले गेले, जे जबरन ज्योत

या चळवळीत सतत कोणत्या ना कोणत्या पद्धतीने सर्व समाजासमोर, न्यायालयासमोर, आपल्याकडे असलेल्या सर्व व्यवस्था, म्हणजे विधी मंडळापासून लोकसभेपर्यंत सतत चर्चेत ठेवले आणि काही मुद्दे पुढे आणले. शेवटी आदिवासी उपरे नाहीत, बाहेरुन आलेले घुसखोर नाहीत. जसे मुंबईत झोपडपट्टीमध्ये असतात किंवा बांग्लादेशी असतात तसे नाही. मूळचे तिथले नागरीक आहेत. त्यांचे हक्क नोंदले गेले नाहीत ही जबाबदारी प्रशासनाची आहे, लोकांची नाही. म्हणून त्यांना गुन्हेगार ठरवणे ही चूक नाही, हा अन्याय झालेला आहे. आणि हा अन्याय आजपर्यंत सरकार मानत नव्हतं, त्या सरकारने आदिवासींवरच्या ऐतिहासिक अन्यायाची कबुली दिली आहे. त्यामुळे पहिल्यांदा या लोकसंख्येला म्हणजे ८-९ % जनतेला, ग्रामीण भागात राहणाऱ्या समुहांना नागरिकत्वच नाकारलं. थोडक्यात एका कायद्यानं गुन्हेगार ठरवलं, दुसरीकडे सातत्याने संधी नाकारली.

विकासाची कारणं देऊन पर्यावरण रक्षणासाठी वनात कोणतेही काम करायचं नाही, असा संवर्धन कायदा ८० म्हणतो. लाईट नाही, पाणी नाही, रस्ता नाही, कुठल्याही प्रकारच्या सार्वजनिक सुविधा नाहीत, कोणत्याही प्रकारचं बांधकाम करायचं नाही, शेती करायची नाही. वनैतर जे काही आहे, ग्रामीण भागातलं जगणं ज्या-ज्या गोष्टींशी निगडीत आहे ती जमीन असो, ते जंगल असो, शेती असो, गुरेचाराई असो कोणतंही काम करण्यावर निर्बंध आणले. संपूर्ण देशाची जी काय गती आहे त्यात या वर्गाला सामील होण्यापासून रोखलं. आदिवासी प्रगतीबाबत ज्या उप-योजना आल्या, त्यांचा लाभ इथल्या आदिवासींना, जे-जे जंगलाशी नातं ठेवून आहेत, जे जंगलात राहतात, त्यांना कधीही मिळालेला नाही. कारण वनामध्ये राहतात तिथे दळी जमीन असो, एक साली जमिनी असो, ज्याचा ते धारा भरतात, दंड नाही. १००-१५० वर्षे झाली. धारा भरतात त्या जमिनींना त्यांना जमीन सुधारणा योजनेचा कोणताही लाभ घेता आला नाही. म्हणजे मोठ्या प्रमाणात आदिवासींचा सबंध जंगलाशी, त्याच जंगलाशी निगडीत विकास कामे कायद्याच्या कचाट्यात येऊन थांबून राहिली.

त्यामुळे नुकत्याच झालेल्या नवीन वनहक्क कायद्याने आदिवासींना एक दिलासा मिळाला. एक नवीन विकासाचं दार खुलं झालेलं आहे. अभिमानाने, सन्मानाने या देशाचे नागरिक आहोत, आमचा सन्मानाने जगण्याचा हक्क आहे, याला मान्यता मिळाली आहे. आमचं धान्य पिकवणं याच्या पलिकडे जाऊन मी आता शेतकरी बनू शकतो, मी सन्मानाने त्या जागेवर राहू शकतो एवढंच नाही तर तेथे मला विकासासाठी आवश्यक असणारी वीज, पाणी, अंगणवाडी, काही बांधकामे करता येतील जी देशातील नागरिकांना मिळतात. स्वातंत्र्यानंतर प्रदीर्घ काळ हा लढा चालला. त्या लढ्याची परिणती हा कायदा आहे.

कोणाच्यातरी डोक्यातून तो नाही आला, तर तो लढून मिळविला. या प्रक्रियेमध्ये देशभरातल्या सर्व जन आंदोलनाच्या कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. कायद्यामध्ये अनेक गोष्टी अंतर्भूत करता आलेल्या आहेत. आपण चिरंजीव किंवा शाश्वत मूल्य जोपासून मागतो. त्यातलं पहिलं आहे की, इथे जी काही संसाधने आहेत त्याचा अधिकार कोणा एका खात्याचा

नाही तर त्याच्याबरोबर, तिथे राहणाऱ्या लोकांचा आहे. त्यामुळे वनखात्याची जमीन आणि ३३% भूभागावर जंगल असले पाहिजे, असे म्हणणे व ३३% जमिनीची मालकी एका शासकीय विभागाकडे असणे यात फरक आहे. त्यामुळे ती मालकी नाही तर जंगल लावणे, राखणे, जोपासणे हे केवळ एका वनखात्याची मक्तेदारी किंवा अधिकारशाही नाही, तर ती पूर्ण समाजाची जबाबदारी आहे. याला वनखाते त्यापासून रोखू शकत नाही. जंगलातील जमिनीवर कलमं लावणे किंवा रोप लावणे यावरही गुन्हे दाखल केलेले आहेत. जंगलातील जमिनीत जंगल वाचलं पाहिजे जर ते वनखात्यानं केलं तरच कायद्याला मान्य अन्यथा नाही. वनसंवर्धन किंवा जतन ही केवळ वनखात्याची मक्तेदारी नाही तर सर्व नागरिकांची जबाबदारी आहे. केवळ जबाबदारी नाही तर जो राखतो तो चाखतो, त्यामुळे तुम्ही जंगल राखा त्यांचा उपभोग घ्या. अशाप्रकारे निर्णयामध्ये कायद्याची मान्यता आहे.

निर्णयामध्ये अधिकार लोकशाहीनुसार लोकांना असला पाहिजे. तो कोणा एका प्रशासनाचा नसावा. विशेषत: गावातले निर्णय हे गावातच झाले पाहिजेत. त्यासाठी गावाबाहेरची यंत्रणा नको. याला मान्यता देऊन ग्रामसभांकडे निर्णयाचे अधिकार द्यावेत, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर ग्रामसभांना बळकट करण्याची संधी आहे. लोकशाहीचा पाया जो ग्रामसभा आहे तो ब्रिटीश राजवटींनी उखडून फेकला होता. त्यानंतर सुध्दा पंचायतींनी ग्रामसभेकडे केलेल्या दुर्लक्षामुळे ग्रामसभा मोडकळीस आलेल्या आहेत. त्याऐवजी गावसभा केवळ ग्रामपंचायतीच्या नाही तर गावच्या ग्रामसभा असाव्यात.

ग्रामसभांना निर्णयामध्ये सहभाग देताना १०० चा कोरम याला छेद देत २/३ चा कोरम म्हणजे तो बहुसंख्येचा निर्णय झाला पाहिजे. ठराविक लोकांचा सहभाग व त्यात पळवाटा असता कामा नये. म्हणून २/३ उपस्थिती आवश्यक आणि तो कोरम पूर्ततेविषयी ग्रामसभांकडे निर्णयाचा अधिकार दिलेला आहे.

हा कायदा व्यक्तिगत मालकी मान्य करतो, तसा समुदायाचे हक्कसुद्धा मान्य करतो. मला वाटतं हे त्याचं वैशिष्ट्य आहे. व्यक्तिगत मालकी ब्रिटीशांनी आपल्याकडे आणली, कारण ती ताबडतोब हस्तांतरण करणं शक्य असतं. गावाची, समुदायाची मालकी हस्तांतरीत करणं कठीण असतं. त्यामुळे व्यक्तीची मालकी आणि समुदायाची मालकी अशा दोघांनाही कायद्यामध्ये मान्यता दिलेली आहे. त्याचबरोबर दप्तर तलाठ्याकडे असलं की तो काय करेल याची शाश्वती नसते. त्यामुळे इथे गावातलं दप्तर गावातल्या समितीकडे देण्याची तरतूद केलेली आहे.

हे पाहिलं तर याच्यामध्ये १३ प्रकारचे हक्क म्हणजे ग्रामीण वा आदिवासी लोकांना जगण्यासाठी काय काय लागतं या सर्वांचा विचार केला आहे. निवारा लागतो म्हणून राहण्याचा अधिकार वनविभागाने दिला आहे. शेती करण्याचा, गुरे चारण्याचा अधिकार वनभूमीमध्ये आहे. फळझाडं लावण्याचा, मासेमारी करण्याचा, शिकार सोडून (म्हणजे आदिवासी आणि शिकार हे जवळकीचं नातं आहे; तर शिकार त्यामध्ये अमान्य आहे.) तर शिकार सोडून आदिवासी लोकांच्या जगण्यास आवश्यक असलेल्या सर्व बाबी कायद्याने मान्य केलेल्या आहेत.

त्याचबरोबर समुहांच्या हक्कामध्ये एक मोठा हक्क आहे तो म्हणजे काही बाबतीमध्ये व्यक्तीगत गरजा सोडून गावच्या काही गरजा असतात. म्हणजे गुरे-चराई, स्मशानभूमी असेल किंवा काही नोंदलेले नाहीत; पण परंपरेने लोक घेत आलेले आहेत. विस्ताराचे हक्क विदर्भामध्ये नोंदले गेलेले आहेत. इतर ठिकाणी त्या भागातल्या देवराई असेल, आदिवासी तिथून फळे गोळा करत असतील किंवा कंदमुळे गोळा करत असतील, पाला पाचोळा गोळा करत असतील. जिल्हाधिकाऱ्यांकडून वनौपज त्या गावाकडे किंवा ग्रामसमूहाकडे सुपुर्द केले जातील. गौण वनोपजाच्या पलिकडे व्यवस्थापनाच्या जैवविविधता राखणं, जोपासणं याचा विकास करणं, पूर्वापार तो आदिवासींच्या परंपरांमध्ये दिसतो. पाण्याचं संवर्धन या अनेक गोष्टी जगण्याशी निगडीत आहेत. आदिवासींना कदाचित 'पेटंट', हे शब्द माहीत नसतील. परंतु अनेक समुदायांमध्ये अशा पद्धतीने, अशा रुढी-परंपरांमध्ये आलेल्या असतील. त्या अभ्यासामध्ये आणलेल्या आहेत. याचं जतन करण्याचा आणि त्याचा हक्क म्हणून उपभोग घेण्याचा अधिकार कायद्याने दिलेला आहे.

एकंदर गांभीर्याने विचार करायचा झाला तर अस्तित्व आणि अस्मिता या दोघांशी निगडीत अनेक बाबी यामध्ये अंतर्भूत आहेत. कायद्याची अंमलबजावणी कोणी करायची याचे नियम, त्याची अंमलबजावणी ग्रामसभेने करायची. त्यामध्ये जिथे अनुसूचित क्षेत्रं आहेत तिथे पेसा कायद्यांतर्गत गावाला टोळी, तांडा, पाडा यांना गाव म्हणून मान्यता आहे आणि ग्रुप-ग्रामपंचायत असेल तर १० गावे, नाहीतर प्रत्येक गावासाठी, वेगळी हद्द निश्चित करेल. त्या हद्दीमध्ये आपण उपभोग घेत असलेले अधिकार त्याच्या ग्रामसभा नोंदी करेल. त्या नोंदींनंतर व्यक्तिगत कोण काय उपभोग घेतो याच्या नोंदी करेल. हे आतापर्यंत जे उपलब्ध नव्हतं ते इंग्रजांच्या काळातलं रेकॉर्ड आज आपण आधार मानतो. आता पुन्हा नव्यानं हे रेकॉर्ड, जाण्या-येण्याच्या वाटांसहित अनेक बाबी त्यामध्ये असतील, अनेक पद्धतीनं गावांमध्ये जी संसाधनं उपलब्ध आहेत. त्याचा कशा-कशासांठी उपभोग घेतला जातो, त्याचंही रेकॉर्ड तयार होईल. आणि पुढे शब्द फक्त रेकॉर्ड करणं नाही, तर ते त्यांना सुपूर्द करणं हा शब्द कायद्यात वापरला आहे. अधिकाराच्या नोंदी करणं आणि अधिकारांच्या नोंदी असलेली कागदपत्रे या गोष्टी गावाकडे किंवा गावसभेकडे सुपूर्द करणे. याच्यासाठी सर्व प्रथम या कायद्यासाठी वेगळी ग्रामसभा घोषित करेल.

गावसभा आपल्याच गावातील १५ लोकांची समिती तयार करेल. या समितीचा अध्यक्ष आणि सचिव निवडला जाईल. त्या समितीला लोकांचे दावे स्वीकारण्याचा हक्क दिलेला आहे. वनहक्क समिती ग्रामसभेच्या वतीने जे स्वीकारेल, त्यानंतर त्याची छाननी, पाहणी, चौकशी, जी काय पडताळणी करायची आहे, त्याच्यासाठी आवश्यक ते पुरावे नसतील तर उपविभागीय समितीकडे मागणी करा व उपविभागीय समितीने विनामूल्य नकाशे, नोंदी यासारखी कागदपत्रे पुरवायची. म्हणजे दावेदाराकडे पुरावा नाही म्हणून त्याची संधी डावलली जाणार नाही. ते पुरावे वनखात्याकडे, महसूल खात्याकडे येतील आणि ते वनहक्क समितीला विनामूल्य द्यायचे आहेत.

त्याच्यानंतर तिसऱ्या टप्प्यावर दोन्ही खात्यांना आणि दावेदाराला नोटीस देऊन जागेवर जाऊन पाहणी, पडताळणी करुन प्रत्येकाने त्याची शक्यता तपासणे आहे. ग्रामसमितीला तो अहवाल सादर केल्यानंतर ग्रामसभेने या शिफारशीप्रमाणे दावा मंजूर करायचा आहे. दावा चौकशीसाठी परत पाठवायचा आहे. त्यावर प्रांताच्या किंवा आय.डी.ओ. च्या खाली उपविभागीय समिती आहे. या समितीचा महसूल अधिकारी किंवा वन अधिकारी, आदिवासी विभाग या तीन खात्यांच्या पलिकडे ३ लोकप्रतिनिधी, अशा पद्धतीने वरती SDO Level ची समिती, त्यावर जिल्हा समिती त्यात जिल्हा परिषदेचे ३ सदस्य घेऊन यात महिलांची संख्या निश्चित केली आहे. या समितीने त्यानंतर अंतिम निर्णय द्यायचा आहे.

हा कायदा मंजूर झालाय डिसेंबर २००६ मध्ये आणि अंमलात येतोय १ जानेवारी २००८ पासून. त्याचे नियम बनलेत २००७ मध्ये. पेसाचे नियम बनलेच नाहीत. ९४ मध्ये कायदा बनून तसं होऊ नये म्हणून या वेळेला संघटना अत्यंत जागरुक राहिल्या. एका वर्षात त्याचे नियम बनले आणि १ जानेवारी २००८ पासून पूर्ण देशात त्याची अंमलबजावणी सुरु झाली. त्यात खूप तरतुदी मांडलेल्या आहेत. या कायद्याचे 'अनुसूचित जमाती आणि परंपरागत वन्य निवासी, वनहक्कांना मान्यता देणे अधिनियम २००६' एवढं मोठं नाव आहे. म्हणजे यात अनुसूचित जमाती आहेत तसेच अन्य परंपरागत वन्यनिवासी म्हणजे ग्रामीण भागात पूर्वंपार असणारी गावं आणि जे बिगर आदिवासी आहेत, त्यांनाही यामध्ये समाविष्ट केलेलं आहे. याकरता वनविभाग, महसूल विभाग आणि आदिवासी विभाग असला तरी याची मुख्य जबाबदारी आदिवासी विभागाकडे दिलेली आहे.

कायदा बनविण्याची जबाबदारी मुळातच आदिवासी व्यवहार मंत्रालयाची होती आणि राज्यामध्ये आदिवासी विभागाकडे त्याची मुख्य जबाबदारी आहे. मुख्यमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय नियंत्रण समिती अस्तित्वात आली. आदिवासी विभागाकडे प्रत्यक्ष तेवढं मनुष्यबळ उपलब्ध नाही आणि म्हणून जिल्हाधिकारी हा जिल्हा प्रमुख या नात्यानं पुढाकार घेऊन महसूल खात्यात त्याची जोरदार प्रक्रिया सुरु आहे. यामध्ये निधीची उपलब्धता आदिवासी खात्याकडून केली जाते आणि जिल्हास्तरीय समिती त्याचा पूर्णपणे आढावा घेते. याकरता प्रमुख जिल्हाधिकाऱ्यांचं प्रशिक्षण, संस्थांचं, वनहक्क समित्यांचं हे सगळ करण्यासाठी यशदा आणि आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (TRTI) दोघांकडे ती जबाबदारी दिलेली आहे. त्यांच्यातर्फे याचे सातत्याने प्रशिक्षण वर्ग होत आहेत. जागरुक्तेच्या पातळीवर हा पहिला टप्पा होता.

मोठ्या प्रमाणात जागृती आणि हा कायदा लोकांपर्यंत पोचावा म्हणून खूप मोठ्या प्रमाणात कॅसेट बनविण्यात आल्या. TRTI ने एक कॅसेट बनविली. काही ठिकाणी स्वत: जिल्हाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला. कविता नि काही गाणी केली ती Jingles रोज सकाळी आकाशवाणीवर, टी. व्ही. वर चालू असतात आणि एस. टी. च्या मागे, तहसील कार्यालया-समोर जाहिरात असते. म्हणजे प्रचार आणि प्रसाराचा एक टप्पा, त्याच्या पुढचा प्रशिक्षणाचा आणि तिसरा अंमलबजावणीचा असं काम सुरु झालं.

त्यामध्ये कलेक्टर खूप active होते. त्यांनी खूप काम केलं. काही जिल्ह्यांमध्ये हा कायदा अस्तित्त्वात आलाय हे ठाऊक नाही. आज असं दिसतंय की या कायद्याचा गाभा दिसतो, आणि त्याच्यातले नियम, परस्पर समन्वय, एकवाक्यता किंवा माहिती आहे असं दिसत नाही. त्यासाठी आपल्याला खूप काम करावे लागणार आहे. समोरच्या प्रशासकीय अधिकाऱ्याचा प्रतिसाद कसा मिळतो आहे, हे पाहावे लागेल. 'वनविभागाने आहे रे वर्गाचं काढून घ्या आणि नाही रे वर्गाला द्या. जमिनदारांच्या जमिनी घ्या व भूमीहीनांना द्या,' हा या कायद्याचा मूळ उद्देश नाही. हा कायदा कुठलीही जमीन काढून कुणाला देत नाही. मुळामध्ये जमिनी काढून घेऊन त्याचं वाटप सुरु केलंय असं अजिबात नाही. पण पेपरमध्ये येणारे पर्यावरणाच्या बाजूने चिंता करणारे असे म्हणताहेत की १० हेक्टर जमीन प्रत्येक कुटुंबाला वाटणार. त्याच्यामुळे असा समज झालेला आहे की आदिवासी जमीन वाटपाचा हा कार्यक्रम आहे.

जमीन वाटपाचा हा कार्यक्रम नाही किंवा जमीन सुधारण्याचा प्रश्न नाही. जे आतापर्यंत रेकॉर्ड केलं नाही, ज्या नोंदी घेतल्या नाहीत त्याचे परिणाम इतकी वर्ष भोगावे लागलेत, त्याला कबूल करून नोंदी घेणारा कार्यक्रम आहे. बाहेरून कोणाचं काही द्यायचे नाही. वनखात्याकडून काढून काहीही द्यायचं नाही. वनखातं अस्तित्वात १८६४ नंतर आलं. त्याच्या आधी समुहाचे हक्म नोंदलेच गेले नाहीत.

वनखात्याच्या बऱ्याच अधिकाऱ्यांना अजूनही असं वाटतंय की आमच्या जमिनी काढून यांना दिल्या जातात. एखाद्या माणसाचे घर हे त्याच्या गरजांशी निगडीत असते. त्यामुळे नोकरी करणारा माणूस, शहरातला माणूस, शेतकरी आणि गावातला माणूस यांच्या घरांच्या रचना वेगळ्या असतात. नोकरी करणारा माणूस कुठेतरी बाहेर आपल्या जगण्याचं साधन शोधतो. निवाऱ्याला घरात येतो. शेती करणारा हा तिथेच जगत असतो, त्याचं जगणं हे आजूबाजूच्या परिसरात असते. तेव्हा त्याचा निवारा म्हणजे फक्त घराचे जोत मोजणे एवढंच असतं असे नाही, तर जोत्याच्या पलिकडे अंगण असते, त्याचे परस असते, धान्य वाळवण, गुरे बांधणे, कंद सुकवणे, पावसाळी भाजी-पाला घेणे असते. हे करण्यासाठी प्रत्येक गावा-गावात आम्हाला भांडावे लागते. त्यांना वाटतं ह्या नोंदी घेतल्यात, त्यामुळे मी उपभोग घेतोय.

त्यामुळे वनखात्याने एक घोषीत केलं होतं की एकही वनग्राम नाही; पण नर्मदेच्या खोऱ्यात लढाई सुरु झाल्यानंतर ७३ खोरी महाराष्ट्रात आली. प्रत्यक्षात आजही ८०% आदिवासींच्या लोकसंख्या वनामध्ये, वनक्षेत्रामध्ये आहे. कायद्यामध्ये अजून एक शब्द वापरलेला आहे ज्याचं जगणं खऱ्या उपजिविकेसाठी, जंगलाशी निगडीत आहे. खरी उपजिविका जंगलाशी निगडीत आहे, हे कसं दाखवाचे जंगलाच्या सीमारेषेच्या बाहेर राहतो; पण जंगलात उपभोग घेतो, हा शब्द जरी कायद्यात असला तरी तो जंगलात राहिलाच पाहिजे असे नाही; तर जंगलावर त्यांचे जगणे अवलंबून असले पाहिजे. ते कसे तपासायचे हा सततचा वादाचा मुद्दा आहे.

शेतीची जमीन मोजायची झाली तर कायद्यामध्ये कुठेही 'लागवड' शब्द वापरलेला नाही. Occupation वापरलेला आहे. आदिवासी भागात लागवड

म्हणजे शेतीची पण असते, भाजीपाल्याची, कंतोळ्याची, झाडांची पण असते, रताळी, काकड्यांची पण असते. यात लागवड हा शब्द सर्रास वापरला जातो सगळ्यांना. पण शेतीच फक्त मोजायची, जे कुळ-कायद्याच्या वेळेला झाले. भात-शेती फक्त मोजा, वरकस जमिनीला कुळ कायदा लागत नाही. अशी बरीच कुळे वरी-नाचणी डोंगर-दऱ्यात पिकवणारी याच्या लाभापासून वंचित राहिली.

इथे गावा-गावात संघर्ष चालू आहेत. चर्चा सुरु आहे की मोजणी कशाने करावी ? पूर्वी मोजणी करणे हे काम टी. आय. एल. आर. किंवा भूमी-अभिलेखा खात्याचे आहे. आता शासनाने एक धोरणात्मक निर्णय घेतलाय की जी.पी.एस. नावाचे जे एक मशीन आहे. त्याने जगभरात नकाशे केले जातात. त्याच पद्धतीने भारतात यंत्रावर सगळे नकाशे उपलब्ध होऊ शकतात. त्यामुळे जी.पी.एस. चे यंत्र प्रत्येकाला दिले आहे. त्याचे प्रशिक्षण कोणाला द्यावे ? याचे प्रशिक्षण वनखात्याच्या कोणालाही नाही. याचे नव्याने प्रशिक्षण द्यायचे असेल तर गावात १०-१२ वी झालेला सचिव आहे. प्रत्येक गावात कोणत्याही जमातीत, अगदी कातकरी असेल. कातकऱ्यांमध्ये सुद्धा प्रत्येक मुलाकडे मोबाईल आहे. मोबाईल नाही असे कुटुंब आम्हाला सापडले नाही. मोबाईल एवढंच ते यंत्र आहे आणि मोबाईल सारखीच त्याची बटनं आहेत. ते फक्त घेऊन फिरायचे. नकाशा आपोआप बनत जातो. तो घेऊन कॉम्प्युटरमध्ये डाटा फिड करायचा. त्यानंतर त्याच्या प्रिंट काढल्या जाणार. ते फॉरेस्टचा माणूस करणार आणि प्रिंटटाऊट एस.डी.ओ. कमिटीकडे निघणार.

आमचा आग्रह सततचा आहे की हे काम आदिवासी मुलांकडे दिले तर तेही हे करू शकतील. त्यांना त्याची जीवनशैली माहीत आहे. गावातला अधिकार देण्यामागची भूमिकाच आहे. कोर्टात माणूस शपथेवर खोटे बोलतो. पण गावाच्या समोर कोणालाही खोटं बोलता येत नाही. प्रत्येकाला कोणाची लागवड कुठे, कोणाची वहिवाट कुठे, हे माहीत असते आणि त्याचा वनविभागाशी संघर्ष आहे. कोणताही वनसंवर्धन कायदा (८० सुद्धा) यापेक्षा श्रेष्ठ नाही. परवाच टाईम्स ऑफ इंडियाला एक मागणी आली की, वनेतर कामासाठी गावातील कोणतीही जमीन द्यायची झाली तर, गावातील नैसर्गिक संसाधने गावाच्या बाहेर द्यायची असतील तर, गावसभेची मान्यता घेतली पाहिजे. या कायद्यांतर्गत कोणतीही जमीन वने तर कामासाठी देताना केंद्र सरकारची मान्यता पुरेशी नाही, तर तुम्हाला आता ग्रामसभेची पण मान्यता घ्यावी लागणार आहे.

कायद्यात असे म्हटलेले असताना केंद्र सरकारने पुन्हा एक नवीन आदेश १८ मे ला काढलेला आहे. त्यामध्ये कायद्यात अशी एक तरतूद आहे की गावसभेला ग्रामपंचायत किंवा शासनाच्या खर्चातून एखादी विकास योजना राबवायची असेल आणि त्याला एक हेक्टर पेक्षा कमी जागेची गरज असेल आणि ७५ पेक्षा कमी झाडे तोडावी लागणार असतील तर ग्रामसभेने मंजूर केलेल्या या विकासाच्या प्रस्तावाला केंद्र सरकारकडून मान्यता देऊन सुरु करता येईल.

वनसंवर्धन कायद्यामध्ये असा प्रस्ताव मान्य होत नाही. कारण तुम्हाला पर्यायी वनीकरणासाठी जमीन तिची किंमत जी ठरलेली आहे, भरावी लागते आणि दुसरी जागा द्यावी लागते. त्याशिवाय लाईटचा

खांब बसवता येत नाही, पाण्याची पाईपलाईन घालता येत नाही. रस्ता बनवता येत नाही किंवा इंदिरा आवासमधले घरकुलही बनवता येत नाही.

वनसंवर्धन कायद्यांतर्गत १६ कलेक्टरांवर केसेस झाल्यात. तालुका, जिल्ह्यातील केसेस असतात, त्यामुळे आपसांतील स्पर्धा दोघांमध्ये होते. काही अधिकाऱ्यांना वाटतं ही बरी संधी मिळाली त्यांना सरळ करण्याची. तिथे कायद्याचा मूळ गाभा बाजूला ठेवून महसूल खात्याने तलाठ्याला सांगायचे की, तुम्ही दावे दाखल करा आणि पेपरवर सगळं करून टाका आणि या जमिनी या त्यांच्याकडून आपल्याकडे आल्या पाहिजेत. वनखात्याची मालकी जाऊन महसूल खात्याची मालकी यावी. तिथे सुद्धा त्यांना कायद्याने काही सवलती दिलेल्या आहेत. या पायऱ्या चढत वरती जायचेय तरच इमारत आणि त्याच्यासाठीची पायाभरणी पक्की होईल. यासाठी आमचा सतत संघर्ष सुरु आहे. तिसरीकडे ग्रामपंचायतीची फार मोठी अनास्था आहे. ग्रामपंचायतीच्या ग्रामसभा यांच्याबद्दल न बोललेलं बरं. त्यांची मिटींग १०० सह्या घेणे एवढीच असते.

ग्रामसभा झाल्याच पाहिजेत हे जोपर्यंत लोकांकडून येत नाही तोपर्यंत ग्रामसेवकाला किंवा कोणत्याही निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीलाही कमीत कमी सदस्य सभेला उपस्थित राहतील तेवढे बरे, म्हणजे आपल्याला हवे तसे निर्णय करता येतात. त्यावेळेस लोकप्रतिनिधी आणि ग्रामविकास विभागाला सुद्धा मोठ्या प्रमाणात तयार करण्याची गरज वाटते. ज्या समाजाच्या संबंधित हा प्रश्न आहे त्या आदिवासींची बदलती मानसिकता, जंगलाकडे, जमिनीकडे आणि आपण जे काही बघतो निसर्गा-बरोबर जगणं त्याबरोबर जमीन म्हणजे क्रय-विक्रयाचं साधन याबद्दल त्या समाजाची जागृती अशा पार्श्वभूमीवर मी येऊन थांबते.

• • •

*''स्थानिक समूहांना जंगलाच्या संवर्धनातून फायदे मिळतात, याची खात्री त्यांना करुन देण्याची गरज आहे. आदिवासी शतकानुशतके जंगलाची राखण करीत आले आहेत. पर्यावरणाच्या प्रश्नामुळे त्यांना विस्थापित करण्यापेक्षा त्यांचे बौद्धीक कौशल्य व अनुभवाचा पर्यावरणाच्या संवर्धनासाठी उपयोग करता आला पाहिजे. आदिवासी वनहक्क कायदा हा त्यांच्या हक्कांची हमी देणारा सर्वोत्तम मार्ग आहे, असे मला वाटते''*

***डॉ. मनमोहन सिंग***
*पंतप्रधान, भारत सरकार*
*(डेक्कन हेराल्ड, ऑगस्ट २००९, नवी दिल्ली)*

# आदिवासी आणि आरोग्याचे प्रश्न

डॉ.अनिल सराफ

***मी आदिवासीच्या प्रश्नांबद्दल बऱ्याच वर्षांपासून काम करत आहे. हे काम करताना लक्षात आलं की आपण केलेलं प्रत्येक काम महत्त्वाचं आहे. आपण जमीनीच्या कायद्याबद्दल चर्चा केली. शेतीबद्दल चर्चा केली. त्यामध्ये प्रामुख्याने एक गोष्ट लक्षात येते, ती म्हणजे जर आपलं आरोग्य नीट असेल तरच आपण ह्या गोष्टी करु शकू; अन्यथा आपण सर्व हे काम करण्यास असमर्थ असेल. जमीन कायदा आणि जमिनी बद्दलच्या गोष्टी आपण जवळून पाहिल्या, ऐकल्या व चर्चा झाली. आता ही जमीन कशासाठी ? या जमिनीचा जर उपभोग घ्यायचा असेल तर आपलं आरोग्य आपल्याला नक्कीच चांगलं ठेवावं लागेल. आपण सर्वांनी मिळून जर योग्य दिशेनं पावलं टाकली तर आपण या गोष्टींच्या जवळ जाऊ शकू.***

आपण ज्या उद्देशाने काम करणार आहोत तो सदैव मनामध्ये ठेवून जर आपण काम केलं तर आपण चांगले आरोग्य संपन्न गाव घडवू शकू. ज्यातून आरोग्य संपन्न असा समाज आपण निर्माण होईल. हा समाज सर्व गोष्टींचा, मग ती शेती असो किंवा इतर कोणतीही, त्याचा उपभोग योग्य रीतीने घेऊ शकेल. त्याचा फायदा आपल्या भारताला सुद्धा नक्कीच होईल. एकीकडे आपण परंपरा म्हणतोय आणि आदिवासींना त्यांच्या जीवनाच्या बाहेर काढायचा प्रयत्न करतोय. दुसरीकडे आपल्याला त्यांची परंपरा पण जोपासायची आहे. आपण म्हणतो की परंपरा जोपासायची आहे आणि आरोग्यपण जोपासायचे आहे. गेल्या साठ वर्षांपासून आदिवासी भागामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. त्या भागात डॉक्टर्स गेलेले आहेत. पण तरी आज आपण म्हणतो की त्याचं आरोग्य धोक्यात आहे.

दुसरीकडे आपण काही गोष्टी त्यांच्यावर लादत असतो. पण आपण थोडासा वेगळा विचार केला की, आरोग्याच्या गोष्टी लादण्यापेक्षा त्या त्यांना त्यांच्या वाटल्या पाहिजेत. 'आपल्या गोष्टी आहेत' हे आपलेपण त्यांच्यामध्ये निर्माण होणार नाही तोपर्यंत मला नाही वाटत की कोणताही आरोग्याचा कार्यक्रम त्या भागामध्ये पूर्णपणे सफल होऊ शकेल. हे विधान करण्यामागचे कारण की, माझा जो अनुभव आहे तो वेगळा आहे. मी तुम्हाला आधीच सांगितले की, आदिवासी जनतेबरोबर काम करण्याचा माझा अनुभव फार कमी आहे. मला समजा गावामध्ये आरोग्याच्या गोष्टी जर आपल्याला बघायच्या असतील, जर तिथले प्रश्न आपल्याला जाणून घ्यायचे असतील, तर आपल्याला त्या परिसरामध्ये सातत्याने जायला हवं. ॲड. दळवी मॅडम म्हणाल्या त्याप्रमाणे आपण त्या गावात राहायला पाहिजे. मग रात्री राहिलो की बऱ्याच गोष्टी शिकायला मिळतात. आणि ती गोष्टी खरी आहे. बऱ्याच रात्री आम्ही लोकांसोबत काढलेल्या आहेत व त्यांचे आरोग्याचे प्रश्न जाणण्याचा प्रयत्न केला

आहे. आरोग्याचे प्रश्न असे फक्त ग्रामसभेतून बाहेर येत नाही. त्यांच्या किचनमध्ये तुमची enty होते तेव्हापासून तो प्रश्न बाहेर येत असतो. तुम्हाला त्यांची food-security काय आहे हे जेव्हा कळतं, तेव्हा ती तळमळ तुमच्यात तयार होते तेव्हा. तुम्ही खऱ्या अर्थाने त्यांच्या आरोग्याला हात घालता.

आरोग्य संकल्पना म्हणजे नुसतं जागृती किंवा त्यांच्यामध्ये नारेबाजी करुन आपण काही निर्माण करणे नव्हे. आपण चांगलं आरोग्य म्हणतो आहे तर आपल्याला घरातील जी व्यक्ती आहे, स्वयंपाक करणारी; मग ती महिला असेल किंवा पुरुष, ती व्यक्ती रोजच्या खाण्यामध्ये कोणत्या पद्धतीचा वापर करते. त्यांना कोणते अन्न खायला देते. त्यांच्या सवयी कशा आहेत. त्यांना लागणाऱ्या सवयी या कोणत्या पद्धतीने लावल्या गेल्या आहेत. याचा आपण विचार केला तर नक्कीच आपण आरोग्याच्या जवळ एक पाऊल जातो.

दुसरीकडे ग्रामसभेमध्ये त्यांनी बोलायला हवं, त्यांनी आरोग्याचे प्रश्न मांडायला हवेत. आरोग्याचे प्रश्न त्यांनी मांडण्यासाठी त्या लोकांना किंवा आदिवासींना एक वेगळा Platform जर निर्माण करावा लागेल. त्यांच्या भागामध्ये बरेचसे असे कार्यक्रम असतात त्याठिकाणी ते मांडू शकतात. गावामध्ये बरीच भित्तीपत्रके असतात. ज्यामध्ये निरनिराळ्या रोगांची माहिती दिलेली असते. पण खरोखरच ती त्यांना कळते का ? याचा जर आपण विचार केला तर आपल्या लक्षात येईल की, त्याला तेवढा वेळ नाही आणि तो समजून घ्यायचा प्रयत्नही तो करत नाही. तो म्हणतो की काहीतरी लावलं आहे. मग हे काम केणी करायचं ? सरकारी डॉक्टरांनी, आपल्यासारख्या एनजीओ नी की आरोग्य सेवकांनी? इथं आम्ही दोघंही डॉक्टर्स आहे आणि Certified आहेत. विद्यापीठ मान्य डॉक्टर आहेत. तुम्हा लोकांना का मान्य झालंय. कारण आम्हाला विद्यापीठाने पदवी दिली आहे. मग गावामध्ये असा कोण आहे की तो लोकमान्य आहे ? असा एखादा लोकमान्य आरोग्यसेवक जर आपण निवडू शकलो तर तो नक्कीच आपल्या हिताचा असणार आहे आणि आपला कार्यक्रम पुढे घेऊन जाण्यास तो आपल्याला मदतच करणार आहे. असा लोकमान्य आरोग्य सेवक कोण ? याची जेव्हा पाहणी करण्यात आली तेव्हा लक्षात आलं की गावात काम करणारा वैदू, भगत, ओझा, नाटु वैद्य असेल. किंवा दाई असेल. ही लोक लोकमान्य आहेत.

लोकमान्य याच्यासाठी कारण लोकांनी त्यांच्यावर विश्वास टाकलाय. त्यांच्याकडे कोणतीही डिग्री नाही किंवा सर्टीफिकेट नाही. पण ते अडी-अडचणींना त्या माणसाला जाऊन भेटतात. त्यांना योग्य सल्ला देत आहेत. सगळेच वैदू काही चांगले असतील असं नाही. यातही भोंदूगिरी भरपूर आहे. कारण पूर्वी या लोकांना वनौषधींचे ज्ञान होते. या लोकांकडून त्याचा दुरुपयोग पण वेगळ्या माध्यमातून होतो. उदा. जवळ-जवळ ८०% वैदू हे पूर्वी दारु गाळण्याचा धंदा करत होते. या परिस्थितीमध्ये लोकांना आरोग्याबद्दल शिकवायचं आणि नेमकं हा वैदू हा दारूचा धंदा करतोय म्हणजे खूप कठीण परिस्थितीत करावं लागणार, हे लक्षात येत होतं. त्यांच्या दारु गाळण्याच्या धंद्याला कुठेतरी पर्यायी उद्योग उभा करू

शकलो तरच ते वैदू आपल्या जवळ येतील हे लक्षात आलं. त्यामुळे वैदुंसोबत काम करण्याचं नक्की केलं गेलं आणि त्यांना पर्यायी उद्योग कसा द्यायचा तर त्याचं दारु गाळण्याच्या भट्टीचे जे मडकं आहे ते बाष्प पेटीला कसं जोडता येईल हा विचार मनामध्ये सुरु झाला; जेणेकरुन medicated वाफ जर ते पेशंटला देऊ लागले तर ते होऊ शकते. त्यातून त्यांना दोन पैसे मिळले तर ते दारुकडे वळणार नाही किंवा त्यांना पुन्हा तसं करण्याची गरज भासणार नाही. सांगायला बरं वाटतं की आमच्या इथे जे वैदू होते, त्यांनी आमच्या उरळीकांचनच्या निसर्गोपचार केंद्रामध्ये प्रशिक्षण दिल्यानंतर स्वत:ची बाष्पपेटी पण तयार केली आणि त्याच मडक्यातून वाफ जायला लागली. आणि त्यातून त्यांना दोन पैसे मिळायला लागले.

एक धंदा बंद झाला, त्या लोकांना बरोबर कळायला लागलं की आम्ही काहीतरी वेगळं काम करतोय. आरोग्याबद्दल आम्ही आता बोलतोय, चर्चा करतोय. त्यामध्ये कोणती औषधे करायला पाहिजे. यावर चर्चा व्हायला लागल्या. या चर्चेतून असे बाहेर यायला लागले की वैदूंना इथंच थांबायचं नाही तर, आपल्या गावातील लोकांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी सुद्धा प्रयत्नशील राहायचे आहे. तुम्ही महाराष्ट्रातील बऱ्याचशा आदिवासी भागात गेला तर बऱ्याच गावात तोरण बांधलेलं असतं. हे तोरण काय आहे ? हे तोरण म्हणजे Preventive measures. गावामध्ये कोणतीही रोगराई येऊ नये म्हणून त्या वैदुंनी त्या गावात काहीतरी वनस्पती टाकलेल्या असतात. रस्त्याच्या कडेला दोन खांब असे लावलेले असतात. कोणत्याही साथीचा प्रकोष आपल्या गावाला होऊ नये म्हणून ते तोरण त्या गावामध्ये बांधले जाते. त्या मागचा उद्देश हाच असतो की या गावातील आरोग्य संपन्न राहिले पाहिजे. लोक त्यांच्या कामाच्या वेळेमध्ये योग्य रीतीनं शेतामध्ये काम करू शकले पाहिजे. म्हणून ते तोरण बांधण्याची पद्धत आहे. काही आदिवासी भागांमध्ये अजूनही एक काढा पाजतात, आणि तो काढा गावातल्या लहान मुलांपासून ते म्हाताऱ्या माणसांपर्यंत सर्वांना घ्यावाच लागतो. त्या मागचा उद्देश हा असतो की त्यांची रोगप्रतिकारक शक्ती वाढावी.

आमचं काम काय आहे तर, कुठे हे आयुर्वेदिक वाङ्मय मध्ये आपल्याला योग्य reference योग्य दिसतात का ? ते बरोबर आहेत का ? जर ते बरोबर असतील तर त्याला प्रोत्साहन द्यायला पाहिजे. काही वेगळं करायचं असेल पण तो पदार्थ आपल्या घरामध्ये आहे का ? आपली आजी पूर्वी आपल्याला एखादा काढा करुन पाजायची; पण आज आपण अशा पद्धतीचे काढे घेतो का ? रोगप्रतीकारक शक्ती वाढावी म्हणून आपण काही करतो का ? नाही. आपल्या घरच्या मसाल्याच्या डब्यामध्ये ज्या सात-आठ गोष्टी असतात, जसं तिखट, हळद, लसूण किंवा मोहरी असेल. या गोष्टींचा कधी आपण विचार केला आहे का? त्यात का टाकायचे ? त्या फोडणीमध्ये टाकल्याने त्या तेलाचे गुणधर्म काय होणार आहेत ? याचा आपण कधी विचार करत नाहीत.

आपण याचा विचार करत नाही आणि इकडे म्हणतो की माझे आरोग्य चांगले राहायला पाहिजे. माझ्या गावाचे आरोग्य चांगले राहायला पाहिजे. आपल्यासारखे ते बाकीच्या गोष्टी वापरत नाही. काही

ठिकाणी कंद खातात. काही ठिकाणी कवळीची भाजी या दिवसामध्ये खातात. सफेद मुसळी असते त्याच्या वरची जे पाने खातात. त्यांचा उद्देश असा असतो की, पुढचा पूर्ण पावसाळाभर कोणताही रोग होऊ नये. त्यांची रोगप्रतिकारक शक्ती वाढावी, म्हणून ती खाल्ली जाते. पावसाळ्यात रोगराई येणार आहे, मग त्यावेळेला त्याचे उपाय त्यांच्याकडे आहे. आपले काम आहे की त्याला चालना देणे. त्याचे डॉक्युमेंटेशन योग्यरित्या करणे. त्या लोकांना त्या बाबतीमध्ये प्रोत्साहीत करणे आणि हा आरोग्याचा कार्यक्रम, हा आपला कार्यक्रम आहे. अस त्यांना वाटणं. ज्यादिवशी त्यांना तो आपला कार्यक्रम वाटेल आणि ज्या दिवशी गाव आरोग्याबद्दल बोलायला सुरुवात करेल, त्यादिवशी आपल्याला खऱ्या अर्थाने आपण खूप चांगल्या दृष्टीने काम पुढे घेऊन गेलो आहोत असे वाटेल.

मी वैदुंच्या बाबतीत जरा जास्तच बोललो, कारण की सार्वजनिक आरोग्यात वैदूंच्या माध्यमातून आरोग्याचा विचार आपल्याला रुजवायचा आहे. आणि तो जर आपण रुजवू शकलो, तर त्याचा वृक्ष व्हायला वेळ लागणार नाही. आणि त्याच वेळेला आपल्याला सरकारी यंत्रणेचा लाभ आपल्या परिसरातील लोकांना कसा घेता येईल हे सांगता येईल. तो लाभ जर त्यांना घ्यावयाचा असेल तर त्यासाठी हे बी त्याठिकाणी रुजवणं आपले कर्तव्य आहे, असे मला वाटते.

सामाजिक आरोग्याबद्दल जेव्हा आपण बोलतो, ग्रामस्वच्छतेबद्दल बोलतो. आणि पाणी शुद्धिकरणाबद्दल बोलतो, तेव्हा तर पाणी शुद्धिकरण करण्याची पद्धत वैदुंनी सांगितली असेल तीच पद्धत घेऊन जर त्याला जोड म्हणून जर आपण त्यांना एखादी गोष्ट सांगितली तर नक्कीच त्याचा फायदा होईल. आपण एकीकडे म्हणतो की पाणी उंचावर ठेवा. त्याच्यामध्ये ते ओगटाळ्याने घ्यावे, वगैरे त्यांना चांगल्या सवयी शिकवतो.

बऱ्याचदा आदिवासी भागातल्या झोपड्यांमध्ये किंवा घरांमध्ये डोकावतो, तेव्हा पाणी हे उंचावर ठेवलेलं असतं. लहान मुलाचा हात पोहोचणार नाही अशा ठिकाणी ठेवलेले असते. ज्या ठिकाणी कोणतेही जनावर पाणी पिऊ शकणार नाही अशाच ठिकाणी पाणी ठेवलेले आढळते. काही ठिकाणी त्याचे Platform आहेत. नंदुरबार वगैरे ठिकाणी त्यांचे Platform करुन त्याच्यावर ठेवले आहे. ह्या पद्धती पारंपरिक आहेत. त्या काही आपण त्यांच्यामध्ये त्या सवयी आणल्या नाहीत. आता फक्त जोड द्यायची आहे. की त्यांनी त्याला नळ बसवावा किंवा ओगटाळ्याने घ्यावे. ह्या गोष्टी आपण त्यांना शिकवू शकतो. त्यांना सांगू शकतो. आता त्यात पाणी शुद्धिकरणाबद्दल जेव्हा आपण त्यांना सांगतो की, क्लोरीनची गोळी त्यात टाका आणि ते पाणी प्या. तर ते म्हणतात की आम्हाला वास येतो. आम्हाला नाही आवडत. आम्हाला नाही प्यायचे असे पाणी. तुमच्या दृष्टिकोनातून ते शुद्ध असेल पण आम्ही आजपर्यंत हेच पाणी पित होतो. आम्हाला त्यांनी काहीच रोग होत नाही.

आता त्यांच्यामध्ये ती सवय निर्माण करणं, त्यांच्यामध्ये तो बदल जर आपल्याला घडवायचा असेल तर आपल्याला देखील त्यांच्या घरचं पाणी

प्यावं लागतं. आपण जर समजा त्यांच्या समोर बॉयल मधील पाणी पित असू तर मला नाही वाटत की तो तुमच्या पाणी शुद्धिकरणाच्या गोष्टी ऐकणार आहे. कारण की तुम्हाला त्या सवयी स्वत:मध्ये रुजवाव्या लागतात. त्यांच्या सवयी तुमच्यामध्ये रुजवाव्या लागतील, तेव्हाच तुम्ही त्यांना नीट सांगू शकाल.

त्या पाण्याला वास येतोय तर ते पाणी रात्रभर ठेव. दुसऱ्यादिवशी वापर. मग आपण असे करु, उद्या आपण सकाळी हेच पाणी पिऊ. जेव्हा तुम्ही हे पाणी त्याच्यासमोर पिता आणि तो पण पितो, तेव्हा त्याच्या लक्षात येते की, हो बाबा हे रात्रभर ठेवलेले पाणी दुसऱ्या दिवशी पिले की आपल्याला त्याचा वास जाणवत नाही. पाणी शुद्‌ध होते. या सवयी त्यांच्यामध्ये रुजवाव्या लागतात.

ग्रामस्वच्छतेबद्दल जेव्हा आपण सांगतोय की, घर कोणत्याही आदिवासीचं असो, कुठेही जा कोणत्याही भागात जा आदिवासीचं घर हे नीट नेटकं आणि स्वच्छच असते. भले तिथं अंधार असेल. तर काचेचं कौलं लावायला पाहिजे, उजेड यायला पाहिजे, हे आपण सांगू शकतो. घराच्या खिडक्या ह्या उंचावर असतात. खाली नसतात, कारण की सरपटणारे प्राणी घरात येऊ नये म्हणून. पण घर आतून स्वच्छ असते. घराच्याबाहेर भरपूर कचरा असतो. घराच्या बाहेर दलदल असेल पण घर स्वच्छ आणि नीटनिटके असते. काही ठिकाणी आपण सांगतो की तुम्ही किचन गार्डन तयार करा. त्यांच्या पोषणाबद्दल पण आपण विचार करतो. आरोग्याच्या प्रश्नाबद्दल देखील बोलतोय. कारण आरोग्याच्या प्रश्नांमध्ये त्यांचं पोषण हा एक भाग असतो.

आपण जर त्यांच्यातल्या कुपोषित मुलांचा विचार केला तर कुपोषित मुले फार कमी असतात. खूप काही जास्त संख्या नसते. कुपोषण केव्हा होत की ज्यावेळेला दुष्काळ होतो. ज्यावेळेला घरामध्ये खाणारी तोंडे वाढत असतात, तेव्हा कुपोषण होते. त्यांचा जो आहार आहे, आहाराची जी पद्धत आहे. त्यांच्यावर अभ्यास व्हायला पाहिजे. त्याच्यावर बऱ्याचशा गोष्टी अजून व्हायच्या आहेत. त्या आहारामध्ये किती चांगली द्रव्य आहेत. म्हणजे पोषक आहेत की नाही ज्याचा अभ्यास फक्त नागली पातळीवर झाला असेल; पण जंगलातल्या कंदमुळांवर झाला आहे का ? नाही झाला तो अभ्यास. अजून शिल्लक आहे. तो अभ्यास देखील व्हायला पाहिजे. त्यांच्या भाजीपाल्याच्या पद्धती, त्यांना मेथी, पालक आवडत नसेल. आपल्याला आवडते म्हणून त्यांना आवडेल पाहिजे, हे चुकीचे वाटते. त्यांच्या भागामध्ये निर्माण होणारे द्रव्य, पालेभाज्या जर त्यांना पोषकता देऊ शकत असतील तर त्याचा अभ्यास करण्याची वेळ आपली आहे. त्याचा अभ्यास आपण करायला पाहिजे. ती पोषक द्रव्यं त्यांना कशी देता येतील ? त्याच्यातून पोषण द्रव्य कोणती आहेत? ती कशी शोधता येतील. आणि ती त्यांच्या अंगवळणी कशी पाडता येतील? याचा पण विचार आपण करायला पाहिजे.

याच्यापलीकडे जर थोडसं पाहिले तर त्यांच्या आंघोळ तर सोडाला त्यांच्या पिण्याच्याच पाण्याचे प्रश्न आहेत. स्नान कुठून करतील ? हा त्यांचा प्रश्न आहे. हात धुवायला पाहिजे पण पाणीच नाही तर काय हात धुणार? म्हणून ते काय घाणेरड्या हातांनी

जेवायचे का? तर नाही. ते लोक हात धुतात. आपल्याला उगीच वाटतं की ते हात धूत नाहीत. ह्या सवयींचा जो बदल आपल्याला त्यांच्यात पाहायला मिळतो किंवा निर्माण करावयाचा आहे तर त्याच्यासाठी आरोग्या बद्दलचा संदेश देणारी योग्य व्यक्ती निवडण्याचं महत्त्वाचं काम आपल्यासमोर आहे. समजा एखादा आरोग्यसेवक पैसे देऊन त्या गावामध्ये पाठवला तर तो जोपर्यंत आपण पैसे देऊ तोपर्यंतच काम करेल. आणि तो त्या गावात राहणारी व्यक्ती नसेल आणि तो जर समजा दुसरीकडे गेला तर पुन्हा आपलं आरोग्याचे काम जिथल्या तिथे थांबते. आपल्याला अशी कार्यक्रमात निरंतरता खरी हवी असेल तर आपल्याला आरोग्याचा सेवक त्या गावातलाच निवडायला हवा, तो कोणीही असू शकतो. वैदूच असला पाहिजे असे काही नाही. ज्याला आरोग्याची थोडीशी जाण आहे. ज्याला आरोग्याबद्दल कळतंय. जो शारीरिक आरोग्यासोबत मानसिक आरोग्याचा पण विचार करतो, नुसताच मानसिक आरोग्याचा विचार न करता तो पशू आरोग्याचा विचार करतोय, पशू आरोग्याचा विचार न करता, जो तेथील वातावरणात असणारी जी काही झाडे असतील त्यांचा देखील करतोय.

वैदुंना एकीकडे आम्ही सार्वजनिक आरोग्याबद्दल गोष्टी सांगतोय, तर दुसरीकडे त्यांच्या पारंपरिक गोष्टी ज्या आहेत. त्यावर अभ्यास करायचे पण काम सुरु असते. परंपरेच्या मागे लागायला पाहिजे, असा भाग नाही. परंपरा चांगल्या असतील त्याला वाव द्यायला पाहिजे. जर एखादी परंपरा घातक असेल आरोग्याच्या दृष्टीकोनातून, तर त्याला कस थांबवता येईल, याच्यासाठी चर्चापण व्हायला पाहिजे. या कामाची निरंतरता बायफच्या काही कार्यक्रमांमध्ये आम्ही करत असतो.

अशाच एका कार्यक्रमामध्ये एक प्रश्न निर्माण झाला होता की, हे पारंपरिक वैदू म्हणजे काय ? एक व्याख्या कराल का ? तर आमच्या वैदुंनी एक सुरेख व्याख्या केली अन् त्या व्याख्येमध्ये आता मलाही असे वाटायला लागलंय की मी डॉ. राहीलोच नाही, मी पण वैदू झालोय. असं वाटतयं, कारण की खऱ्या अर्थाने मी जेव्हा त्या लोकांसोबत काम करतोय तेव्हा मी स्वत:कडे त्याच दृष्टीने पाहात असतो, की आपण हे करु शकू का ? आपल्याला झेपेल का ? त्याची स्वत:ची व्याख्या केली, ती व्याख्या मी तुम्हाला सांगतो आणि मी इथे थांबणार आहे.

'लोकांच्या आरोग्यासाठी झटणारा मी एक साधा आरोग्यसेवक आहे. सर्वसाधारण माणूस माणुसकी जागरुक ठेवणारा, वेळी-अवेळी आरोग्याबाबत काळजी घेणारा, आरोग्य अडचणीत असताना लोकांना मदत करणारा, स्वत:च्या कामापेक्षा रोग्याच्या आरोग्यास महत्व देणारा, तुम्हा सर्वांचा मित्र. माझा कुणी शत्रू नाही असे माननारा मी एक साधा सेवक अर्थात पारंपरिक वैदू. वनस्पतीची काळजी घेऊन वनस्पतीद्वारे उपचार करणारा, कोणत्याही मोबदल्याची आशा न ठेवणारा मी वैदू, आपण सर्वांना विनंती करतो की, आपण सर्व जण संकल्प करु आपले आपल्या कुटुंबाचे आपल्या गावाचे आरोग्य टिकवू व आपला भारत देश सुख, शांती आणि आरोग्य संपन्न करु मला तुमची साथ हवी आहे. देणार का? धन्यवाद.

***(पृष्ठ क्र. ३० वर पहा)***

# आदिवासी आणि पर्यावरण

श्री. मोहन हिराबाई हिरालाल

***आपल्या सर्वांना हे माहीतच आहे की आदिवासी आणि पर्यावरण यांचे एक अतूट नाते आहे, पण आता जागतिकीकरण, उदारीकरण यामुळे जे काही नवनवीन प्रवाह येत आहेत. त्यामुळे या नात्यावर, आदिवासी संस्कृतीवर, जीवनावर काही परिणाम होत आहे का ? जर होत असेल तर कशा- प्रकारे होत आहे, याबद्दलचे आदिवासी आणि पर्यावरण या विषयावर काम करणारे ज्येष्ठ अभ्यासक श्री. मोहन हिराबाई हिरालाल यांचे अनुभव त्यांच्याच शब्दात.***

मानवी जीवन आणि पर्यावरण या प्रश्नाबाबतची जागरुकता समाजाच्या सर्वच स्तरांमध्ये वाढलेली जाणवते. असा एक कालखंड आला होता की माणसाला असे वाटायला लागले होते की, मी निसर्गापेक्षा वेगळा आहे आणि माझ्यामध्ये निसर्गावर मात करण्याची ताकद आहे. विशेषत: विज्ञान तंत्रज्ञानाच्या गोष्टी हातात आल्यावर हा अहंकार अधिकच वाढला. औद्योगिक क्रांतीनंतर त्याचा अहंकार परमोच्च स्थानी पोहोचला, पण त्यानंतर असा एक कालखंड आला की, या गोष्टींचे दुष्परिणाम दिसायला सुरुवात झाली. ह्या दुष्परिणांमामुळे संपूर्ण जगाला ह्या प्रश्नांवर विचार करायला भाग पाडले.

एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला सर्व देश व त्यातील विद्‌वानांचे एकमत झाले की, आपले चुकले आहे. माणूस हा सुद्धा पर्यावरणाचा अविभाज्य घटक आहे, ह्याचा आपल्याला विसर पडला आहे. ह्या चुका कशा सुधारता येतील, जागतिक पातळीवर प्राथमिकतेने काय काय उपाय योजना करता येतील याबद्दल जागतिक पातळीवर विचार प्रक्रियेस सुरुवात झाली.

ह्या सगळ्या प्रक्रियेचा आढावा घेतल्यास एक गोष्ट लक्षात येते की, आपण ज्याला सभ्यता म्हणत होतो, प्रगती म्हणत होतो किंवा विकास म्हणत होतो, याच्यावरच पुनर्विचार करण्याची गरज आहे. ज्या आदिवासींना तुम्ही मागासलेले आहात. तुमची संस्कृती मागासलेली आहे. तुम्ही सभ्य झाले पाहिजे. मूळ प्रवाहात आले पाहिजे त्यासाठी हे हे केले पाहिजे. असे त्यांना सांगितले. पण ह्या आदिवासींनी ह्या गोष्टी न ऐकता ते करत असलेल्या गोष्टी टिकवून ठेवल्या आणि त्यामुळेच त्यांचे 'आदिवासीपण' टिकून राहिले. आज बाकी सर्व मानवी समाजाला आदिवासींच्या ह्याच सर्व गोष्टी शिकण्याची गरज निर्माण झाली आहे.

आपण ज्यांना आदिवासी म्हणतो ते कोण आहेत? ते ह्या मानवी समाजाचे घटक आहेत; पण त्यांनी इतर समाजापेक्षा काही वेगळ्या गोष्टींची निवड केली. जगण्याची रीत, जीवन दृष्टी, निसर्गाशी असलेला संबंध यासाठी त्यांनी इतर समाजापेक्षा वेगळा विचार केला. आता आपल्याला जर पर्यावरणाचा विचार

करायचा असेल तर इतर सर्व समाजाला आज 'आदिवासी' होण्याची गरज आहे. जरा वेगळ्या पध्दतीने विचार केला तर सगळ्यांना मानसिक गुलामगिरीतून बाहेर पडण्याची गरज आहे. पण बाजूला सुपिरिऑरिटी कॉम्प्लेक्स तर दुसऱ्या बाजूला इन्फिरिऑरिटी कॉम्प्लेक्स निर्माण झालेला दिसतो. एका बाजूला साम्राज्यवाद इतका वरचढ झाला आहे की आदिवासींना आपल्यामध्ये काही चांगल्या गोष्टी आहेत, असे वाटण्याची परिस्थितीच शिल्लक ठेवली नाही. राज्यकर्ते म्हणतील तेच सगळे बरोबर. त्यांची संस्कृती म्हणजे सर्वोच्च संस्कृती. त्यांची भाषा म्हणजे सर्वोत्कृष्ठ भाषा. त्यांच्या वेषभुषेप्रमाणे सगळ्यांनी वेषभूषा करावी. ही अशा प्रकारची साम्राज्यशाही प्रवृत्ती आहे. ती फार खोलपर्यंत रुजलेली आहे. आज पर्यावरणाचा विचार करताना आपल्याला ह्या प्रवृत्तीचा विचार करण्याची गरज आहे. एखादा समाज करतो तेच सगळे बरोबर असे न म्हणता नक्की काय योग्य आहे. कुणाचे काय घेतले पाहिजे आणि काय सोडले पाहिजे याचा विचार करणे अपरिहार्य आहे.

आत्तापर्यंत 'इकोसिस्टिम' बाबत जी चर्चा होत असते त्या चर्चामध्ये मानव अशा टप्प्यावर पोहोचला आहे, तो टप्पा म्हणजे निसर्गातील प्रत्येक गोष्टीला काहीतरी काम दिलेले आहे. तिच्या काही विशिष्ट सेवा आहेत. पर्यावरण रक्षणासाठी या सर्व गोष्टी टिकवून ठेवणे फार आवश्यक आहे. पर्यावरण असे जेव्हा आपण म्हणतो, त्यात जीव साखळी आणि अन्न साखळी यांना खूप महत्त्व आहे. यातली एक जरी साखळी तुटली तरी त्याचे काय काय दुष्परिणाम भोगावे लागतात याचे भान आता येऊ लागले आहे. त्याचबरोबर या सगळ्या गोष्टी सुट्या सुट्या नसून एकमेकांशी जोडलेल्या कॉम्प्लेक्स सिस्टिमचा भाग आहेत हेही लक्षात येऊ लागले. या टप्प्यावर मानवाच्या असे लक्षात आले की 'मी' सोडून बाकीची सृष्टी काय करते याचा विचार करण्याची गरज आहे. पण जर 'मी' हा या निसर्ग व्यवस्थेचा एक अपरिहार्य भाग आहे, तर मग माझी भूमिका काय आहे ? माझ्या Services काय आहेत, ह्यांची उत्तरे शोधण्याची वेळ आता आली आहे. ज्याप्रमाणे पाणी, माती, पशू, पक्षी आणि हवा या सगळ्यांना काही भूमिका आणि सेवा आहेत, त्याचप्रमाणे निसर्गाने मानवासाठी काही भूमिका दिल्या आहेत. ज्ञान आणि व्यवस्थापन ही दोन वेगळी कौशल्ये मानवाला दिलेली आहेत.

त्यामुळेच मानवाकडे निसर्गातील सर्व गोष्टींबद्दल ज्ञान मिळवणे आणि त्या आधारावर व्यवस्थापन करणे ही एक मोठी जबाबदारी आली आहे. ही जबाबदारी आधुनिक, प्रगतीशील, सभ्य म्हणवणाऱ्या समाजाने टाळली; पण आदिवासी समाजाने धरुन ठेवली. आज आदिवासी समाजाला त्यांनी धरुन ठेवलेल्या जबाबदारीबद्दल जाहीरपणे मान्यता देण्याची वेळ आलेली आहे. तसेच जाहीरपणे हेही मान्य करण्याची वेळ आली आहे, की आत्तापर्यंत आम्ही सतत तुम्हाला न्यूनगंड दिला; पण आता आम्हाला तुमच्याकडून शिकण्याची गरज आहे. स्वत:मध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने ही अतिशय आवश्यक बाब आहे.

आदिवासी समाजात अनेक चांगल्या गोष्टी पूर्वंपार आल्या आहेत. याचे एक मोठे उदाहरण म्हणजे गोंड आदिवासी जमातीमध्ये चालत असलेले जीवन शिक्षण. आजचा स्वत:ला 'आधुनिक' मानणारा जो समाज आहे त्या समाजाला असे वाटते की, ही

आधुनिकता रुजवण्याचे सशक्त माध्यम म्हणजे 'शिक्षण'. आणि ह्या शिक्षणाचे मूलभूत तत्त्व म्हणजे 'प्रत्येकाला शिक्षणाचा जन्मसिद्ध अधिकार आहे.' हे मुलभूत तत्त्व स्वत:ला आधुनिक म्हणवणाऱ्या समाजाच्या दृष्टीने एक स्वप्न आहे. शिक्षण घेण्यासाठी महत्त्वाची गोष्ट म्हणजे शाळेमध्ये प्रवेश मिळाला पाहिजे ही आहे. आणि शिक्षणासाठी तुम्हाला कुठेतरी प्रवेश घ्यावा लागतो ही गोष्टच शिक्षणाच्या मुलभूत तत्त्वाच्या विरोधी आहे. कारण जिथे प्रवेश घ्यायला लागतो तिथे शिक्षक नेमावे लागतात. त्यांना पगार द्यावा लागतो. इमारती बांधाव्या लागतात. ह्या सर्व गोष्टींचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापन मंडळ नेमावे लागते. ह्या सर्व गोष्टींना आर्थिक पाठबळ लागते. त्यामुळेच सर्वांनी शिक्षण घेणे यामध्ये अनेक मर्यादांची भिंत उभी राहाते.

याउलट या गोंड आदिवासी समाजाला शिक्षणाचे जीवन मूल्य आणि जीवन शिक्षणाचे महत्त्व इतक्या बारकाईने समजले होते की, समाजातील सर्व घटकांना हे शिक्षण मिळावे म्हणून ह्या गोंड आदिवासी समाजाने गावालाच शाळा केले. या समाजाने शिक्षणाची बाहेर सुरुवात होण्याचे एक वय ठरवले. ते वय म्हणजे जेव्हा मुले किंवा मुली आईपासून दूर होऊन बाहेर खेळायला जायला लागतात. त्यांना घरी बोलावताना पकडून आणावे लागते ते वय. ह्या वयात त्यांचा शिक्षण संस्थेत प्रवेश होईल अशी एक सुंदर रचना 'गोटूल' द्वारे केली. ह्या समाजातील मुले-मुली जेव्हा बाहेर जाऊन खेळायच्या वयामध्ये येतात तेव्हा 'गोटूल' या सामाजिक जीवनशाळेत प्रवेश करतात. 'गोटूल' मधील प्रवेशाची पध्दत बघितली तर ती मानवसशास्त्रीय दृष्टीने अत्यंत बारकाईने विचार करुन ठरविलेली असावी असे वाटते. ह्या शाळेत प्रवेश कसा होतो ? ८-१० वर्षांची मुले-मुली या जीवन शाळेत प्रवेश करतात. या वयापासून ते लग्न होईपर्यंत ही मुले मुली या गोटूल नावाच्या जीवन शाळेत असतात. थोडक्यात ८-१० वर्षांपासून २५-३० वर्षांपर्यंतच्या मुलामुलींचा हा एक समूह असतो. प्रवेशाची काय रीत असते, तर गावापासून दूर जिथे गावातले लग्न झालेले लोक काही ऐकू शकणार नाही अशा ठिकाणी हा समूह जमतो.

नवीन लहान मुलामुलींना प्रवेश देण्याचा एक विधी केला जातो. या मुलांना फुटाणे द्यायचे आणि ते देत असताना त्यांचे एक वेगळे नाव ठेवायचे की जे गावातल्या लोकांना कळणार नाही. या मुला मुलींचे एक स्वतंत्र जग असते. जिथे मुलगा-मुलगी असा भेद न करता सर्व मुले-मुली एकत्र राहतात, नाचतात, खेळतात, मस्ती करतात. याचा परिणाम असा दिसतो की इतर समाजामध्ये मोठ्या प्रमाणात दिसणारे लैंगिक विकृतीचे प्रमाण हे या गोंड आदिवासी समाजात अत्यंत अत्यल्प दिसते. जवळ जवळ दिसत नाही असे म्हटले तरी चालेल.

तसेच शिक्षण शास्त्रातील एक महत्त्वाचे म्हणजे चांगला शिक्षक कोणता तर जो किंवा जी मुला-मुलींपेक्षा थोडासाच मोठा/मोठी असते. या सिध्दांताचा वापर गोटुल' मध्ये सहज केला जातो. इथे शिक्षक म्हणजे २५-३० वर्षांपर्यंतचे ताई-दादा असतात. त्याचप्रमाणे आवडीप्रमाणे शिक्षण, जे की बाकीच्या समाजाच्या दृष्टीने एक स्वप्न आहे ? प्रत्यक्षात गोटूल मध्ये हे असेच घडते. गोटूलमध्ये गेल्यावर मुलगा-मुलगी काय करतात तर आपल्या आवडीप्रमाणे ताई-दादा निवडतात. ज्याला गाणे आवडते तो जी ताई गाणं शिकवते त्या ताईला शोधतो. जो चांगले वाद्य वाजवतो त्याच्यामागे वाद्य आवडणारी मुले आणि

मुली असतात. काही मुलांना दंगा, मस्ती, शिकार करणे आवडते ती तस-तसे ताई दादा निवडणार. गोटुलमध्ये मुलांना सर्व प्रकारचे पर्याय आहेत. २५-३० वर्षांपर्यंतचे सगळ्याप्रकारचे ताई-दादा असतात. त्यामुळे मुलांना आपली आवड ओळखण्याचा प्रयत्न करणे, तपासणे आणि पक्की करणे याकरता संधी मिळते. आपल्यापेक्षा थोडेसे मोठे शिक्षक असल्याने ही प्रक्रिया आनंददायी असते. सतत उत्सव चालू असतो. ही चारभिंतींमधील शाळा नसते. आज वाटले तर जंगलात गेले, नदीवर गेले. गावाचे काहीही सामूहिक काम असेल तर त्याची जबाबदारी घेणे. एक जबाबदार नागरिक होण्यासाठी जबाबदारी कशी पूर्ण करायची, निर्णय कसे घ्यायचे, व्यवस्थापन कसे करायचे, कायदे कसे करायचे, त्यांची अंमलबजावणी कशी करायची याची एक छोटी व्यवस्थाच गोटुल' मध्ये असते. गोटूल म्हणजे जगण्यासाठी सक्षम, आरोग्यपूर्ण, मानसिक, शारीरिक स्वास्थ्य असणारी नागरीक घडविणारी शाळाच!

पण बाकीच्या समाजाने ह्या समाजाचे नेतृत्व करणाऱ्या बाहेरच्या शिक्षण पध्दतीत शिक्षण घेतलेल्या आदिवासी मुला-मुलींना सांगितले की फार वाईट संस्था आहे ही तुमची. याला एकच कारण होते, ते म्हणजे ... बाहेरच्यांना याच्यात काय दिसले की मुले मुली एकत्र असतात आणि त्यांना लैंगिक संबंध ठेवण्याची सूट आहे. ह्या विकृत दृष्टीमुळे बाहेरील लोकांना एवढेच दिसले. त्याचे नियम, रचना, मूल्यव्यवस्था मापदंड याचा विचारच केला गेला नाही. उलट त्यांनी शिकून सवरुन आपल्या समाजाचे नेतृत्व करायला पुढे आलेल्या आदिवासी मुलांना असे सांगितले की, ''तुम्ही हे काय करता ? मुले मुली एकत्र राहतात म्हणजे पापच आहे'' आणि या मुलांनी आपल्या समाजाला सुधारण्यासाठी पहिले काम काय केले तर गोटूल बंद करण्याचे काम केले. आपल्याला सुधारलेल्या समाजासारखे व्हायचे आहे, म्हणून जीवन शिक्षण जे निसर्गाशी संबंधित होते ते आपल्या हाताने तोडून टाकले.

आज अपापल्याला आपली चूक कळायला लागली आहे, आणि दुरुस्त करण्याची इच्छा आहे. मुळातूनच ही व्यवस्था बदलण्यासाठी शिक्षण हेच महत्त्वाचे हत्यार आहे. आता आपण असा विचार केला पाहिजे की या शिक्षणामध्ये आपण गोटूल मधल्या काय काय गोष्टी आणू शकू. पूर्वीप्रमाणे गोटूल चालवणे आता शक्य नाही; पण त्यातली कोणती तथ्ये, रचना आणि पध्दती आधुनिकतम शिक्षण पद्धती निर्माण करण्यासाठी उपयोगी पडतील. लैंगिक शिक्षणाबाबतीत स्त्री-पुरुष समानतेच्या बाबतीत, आरोग्यदायी मानसिकता असणारे स्त्री-पुरुष घडावेत म्हणून आणि उत्तम नागरिक घडावा म्हणून गोटूल मधील कोणकोणत्या गोष्टी घेता येतील, याचा विचार करणे हे पर्यावरण रक्षणाचा विचार करण्यासाठी आवश्यक आहे, असे मला वाटते.

पर्यावरणाच्या बाबतीमध्ये मुळामधून विचार करुन आदिवासी समाजाला ताकद देणारी अशी आणखी एक गोष्ट आहे, ती म्हणजे जैवविविधता कायदा २००२. ह्या कायद्याचे वैशिष्ठ्य असे की हा कायदा फक्त भारत सरकारच्या प्रयत्नांनी आलेला नाही तर यामागे एक आंतरराष्ट्रीय प्रक्रियेचे बळ आहे. ती प्रक्रिया म्हणजे Conservation on biodiversity. या प्रक्रियेमध्ये सर्व देशांनी असे ठरवले की २१ व्या शतकात सर्वांनी मिळून प्रामुख्याने करायचे जे काम आहे, ते म्हणजे जैवविविधतेचे संरक्षण.

पर्यावरणाला वाचवायचे असेल तर त्यादृष्टीने पहिले पाऊल म्हणजे जीव विविधतेचे रक्षण करणे. कारण जीव विविधतेची जर हानी झाली तर ती भरुन येणारी नाही. आज आपल्याला काय करायला पाहिजे तर ज्या संकट-ग्रस्त गोष्टी आहेत त्यांना वाचवायला पाहिजे आणि विकासाची एक अशी रीत स्वीकारली पाहिजे, ज्या-मध्ये मानवाच्या हातून घडलेल्या चुका परत घडणार नाहीत. हा जैवविविधतेचा कायदा बनवताना अनेक चांगल्या गोष्टी झालेल्या आहेत.

आत्तापर्यंत कायदा करणे ही राज्यकर्त्यांची त्यांच्या प्रशासकीय विभागाची जबाबदारी आहे, असेच समजले जात होते. त्याचबरोबर कुठल्याही गोष्टीचे संरक्षण करायचे म्हटले की ताबडतोब कायदा व्हायचा की लोकांनी याचा वापर करु नये; पण असे कायदे करुनही जे वाचावायचे ते नष्ट होत आहे हा अनुभव आला. हा अनुभव देखिल जैवविविधतेचा कायदा करताना सुदैवाने लक्षात घेतला गेला. Conservation on bilodiverrity मध्ये काही धोरणे ठरविली गेली. काही मापदंड आखले गेले. जैवविविधता कायदा बनवताना यातील तीन महत्त्वाच्या गोष्टींचा समावेश केला गेला. त्या गोष्टी म्हणजे संरक्षण, टिकावू उपयोग आणि त्यामधून होणाऱ्या लाभाचा सर्वांना न्यायोचित वाटा देणे. जी गोष्ट वाचवायची आहे तिचे संरक्षण केल्यानेच ती सुरक्षित राहाते, असा जो काही समज होता त्यात बदल व्हायला लागला आहे. गोष्टींचे नुसते संरक्षण करुन चालत नाही तर तिचा उपयोग करणे फार गरजेचे आहे. पण तो उपयोग हा टिकावू असायला हवा. Sustainable use हे फार महत्त्वाचे आहे. मला फार आश्चर्य वाटते की Wildlife Protection Act (वन्यजीव संरक्षण कायदा) बनवताना हा साधा अनुभव का लक्षात घेतला नाही.

जर खाल्ल्यामुळे एखादी वस्तू नष्ट होते, तर मग कोंबड्या आणि बकऱ्या तर केव्हाच संपायला पाहिजे होत्या. पुरातन काळापासून मोठ्या प्रमाणावर कोंबड्या आणि बकऱ्या यांचा वापर खाण्यासाठी केला जातो. कोंबड्या बकऱ्यांसाठीही कायदा करायला हवा होता. जीव वाचवायचा म्हणजे फक्त वाघांचाच वाचवायला हवा का ? पण नाही जगातले जीव वाचवायला पाहिजेत. म्हणजे फक्त वन्यजीव वाचवायला पाहिजेत, कारण ते आम्ही खात नाही. म्हणजे कायदा करताना काही गोष्टी कायदे करणाऱ्याला सोईस्कर अशाही केल्या जातात.

सुदैवाने जैवविविधता कायदा करताना या गोष्टी लांब ठेवल्या गेल्या. संरक्षण, टिकावू उपयोग आणि त्याच्या लाभामधून न्यायोचित समान वाटा मिळाला पाहिजे या तीन गोष्टींच्या आधारावर हा कायदा केला गेला. आणखी एक सुदैवी गोष्ट म्हणजे हे कोण करेल? यावरही विचार केला गेला. हे झाले पाहिजे, हे केले पाहिजे हे ठीक आहे, पण हे कोण करेल? सरकार नाही करु शकत. सरकारने नेमलेले नोकरदार नाही करु शकत. तर लोकच हे करु शकतील. असे लोक की जे कायद्याच्या अंमलबजावणीत काही चूक झाली तर ज्यांच्या जीवाला चटका बसतो, नुकसान होते, अशा लोकांनी जर ही जबाबदारी घेतली तरच हे होऊ शकेल. यासाठी लोक जागृत होणे खूप गरजेचे आहे. जैवविविधता कायद्यात असे स्पष्टपणे म्हटले गेले आहे की, 'लोकांच्या' जैव विविधता समित्या असतील. 'लोकप्रतिनिधींच्या' न म्हणता लोकांच्या असे म्हटले आहे. पण ह्या समित्या निर्माण कशा होतील ? आपण मगाशी म्हणालो की केवळ झाले पाहिजे म्हणून होत नाही, तर त्यासाठी काही पध्दत, रीत असावी लागते. आत्तापर्यंत समिती बनवायची

म्हटले की असे व्हायचे की सदस्यांची नावे कुणीतरी नोकरशहा सुचविणार आणि सरकार त्याला मान्यता देणार.' समिती म्हटल्यावर आपल्या डोळ्यासमोर काय येते की कुणीतरी १०-१५ लोक, कुणी अध्यक्ष, सेक्रेटरी आणि सरकारची त्याला मान्यता; पण या कायद्याने याला छेद दिला आहे.

ह्या कायद्याचे कलम ४१ आहे ते फार महत्त्वाचे आहे. या कलमामध्ये असे म्हटले आहे की Local body shall constitute the Biodiversity Management Committee. भारतीय घटनेप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्था कोणत्या तर ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महानगरपालिका. म्हणजे जैवविविधता कायद्यातील कलम ४१ प्रमाणे ह्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपल्या कार्यक्षेत्रातील जैवविविधता व्यवस्थापन समित्या स्थापन कराव्यात. ह्या कायद्यामध्ये इतर कायद्यांसारख्या खूप बांधील (restricted) गोष्टी सांगितल्या नाहीत. याउलट या कायद्यामध्ये लोकांना एक अधिकार दिला आहे. जे जास्तीत जास्त चांगले असेल, स्थानिक जैवविविधता समित्या स्थानिक परिस्थितीनुसार जे जास्त योग्य वाटते, त्याप्रमाणे निर्णय घेऊ शकतात. त्यांनी घेतलेल्या निर्णयाला कुणाचीही मंजुरी घेण्याची गरज नाही. जैवविविधता संरक्षण ही गोष्ट पर्यावरणाच्या दृष्टीने आदिवासी आणि गैर आदिवासी दोघांकरिता सारखीच महत्त्वाची गोष्ट आहे आणि दोघांना एकत्र आणणारी गोष्ट आहे. त्यामुळे जैवविविधतेचा विचार करताना आदिवासी आणि गैर आदिवासी असा वेगळा विचार करुन चालणार नाही. संपूर्ण मानवी समाजाला ज्या उपकारक गोष्टी आहेत, दोघांनी एक दुसऱ्यापासून शिकाव्यात आणि अशी संधी या कायद्यांद्वारे उपलब्ध झाली आहे.

अशाप्रकारे स्थापन झालेल्या समित्यांना कायद्याने व्यवस्थापनाचा अधिकारही दिला आहे. आता इथे व्यवस्थापन या शब्दाचा अर्थ नीट समजून घेण्याची गरज आहे. व्यवस्थापन ही जास्त व्यापक गोष्ट आहे. यात संरक्षण, संवर्धन, त्याचबरोबर हे करण्यासाठी लागणारे नियोजन व कराव्या लागणाऱ्या सर्व गोष्टी येतात. व्यवस्थापन हा मालकीपेक्षा जास्त महत्त्वाचा शब्द आहे. मालक कोणीही असू द्या. व्यवस्थापन ज्याच्या हातात असेल, त्याच्या हातात सर्व सूत्रे असतात. या कायद्याने या समितीला सर्व अधिकार दिले आहेत. एक म्हणजे व्यवस्थापनाचा पूर्ण अधिकार, त्याच-प्रमाणे नियमन करण्याचा अधिकार, नियम मोडल्यास दंड करण्याचा आणि दंड वसूल करण्याचा अधिकार, हे सर्व अधिकार जैव-विविधता कायद्याने जैवविविधता व्यवस्थापन समितीला दिले आहेत. आज असे आहे की, राज्य किंवा केंद्र सरकार सर्व गोष्टींचे मालक आहेत, म्हणून जर काही नैसर्गिक किंवा जैवविविधता संसाधन वापरले किंवा तो वापरण्याचा परवाना/लायसेन्स दिले तर त्यापासून मिळणाऱ्या मिळकतीमध्ये royalty घेण्याचा अधिकार सरकारला आहे.

पण या कायद्याने जैवविविधता समितीला हा अधिकार दिला आहे की, त्यांच्या कार्यक्षेत्रातील कुठलीही जैव विविधतेशी संबंधित गोष्ट कुणालाही बाहेर द्यायची असेल तर सरकारची परवानगी घ्यावी लागेल; पण जर सरकारला जैव विविधते संबंधित गोष्टी वापरायच्या असतील तर सरकार सुध्दा जैवविविधता व्यवस्थापन समितीला विचारल्या-शिवाय ती परवानगी देऊ शकत नाही. परवानगी दिल्यावर म्हणजे समितीच्या संमतीने परवानगी दिल्यावर त्या गोष्टीपासून जे मूल्य मिळणार आहे, ते

मूल्य ह्या समितीला मिळणार आहे. या कायद्याने या समितीच्या नावाने बँकेत खाते उघडण्याची व्यवस्था केली आहे. याला 'जैवविविधता फंड' म्हटले आहे. ह्या फंडामध्ये दंडामधून येणारी रक्कम, मूल्य म्हणून मिळालेली रकम आणि सरकार किंवा इतर विभागाकडून येणारी रक्कम ह्या सर्व रकमा ठेवल्या जातात.

या जैवविविधता कायद्याने जैवविविधता व्यवस्थापन समितीला पूर्ण अधिकार दिले आहेत. आता सर्वात महत्त्वाची एक गोष्ट लक्षात घेण्याची गरज आहे. आत्तापर्यंत समिती म्हटल्यावर आपल्या डोळ्यासमोर काय येते तर अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेक्रेटरी; पण आता ही कल्पना बदलण्याची गरज आहे. ह्यात समिती म्हणजे सर्व गावातल्या लोकांपासून बनते ती समिती आणि त्यातले अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष असतात. त्यांना व्यवस्थापन मंडळ असे म्हटले गेले आहे. या अशा संकल्पनेचा वापर सरकारच्या एका योजनेमध्ये या आधीपण केला गेला आहे.

याप्रमाणे जैवविविधता समित्या बनवताना या समितीचे आधारभूत घटक म्हणून छोटे छोटे टोले, पाडे यांचा समावेश करावा. ह्याचे कारण की ह्या टोले, पाड्यातील लोक एकमेकांच्या जवळ राहतात. एक हाक दिल्यावर ते एकत्र येऊ शकतात. चर्चा करु शकतात. निर्णय घेऊ शकतात. अंमलबजावणी करु शकतात. अंमलबजावणी करताना काय काय सुधारणांची गरज आहे ह्यावर विचार करु शकतात. परत हे सर्व करुन बघू शकतात.

त्याची पुढची पायरी म्हणजे या आधारभूत घटकांमधून काही प्रतिनिधी घेऊन ग्रामपंचायत, पंचायत समिती, नगरपालिका या पातळीपर्यंत समितीची बांधणी केली तर निश्चितच एक सशक्त पर्यायी राज्यव्यवस्था निर्माण होऊ शकेल. आपण राज्य व्यवस्था बदलण्याच्या गोष्टी करतो. लोकांकडे ताकद गेली पाहिजे असे म्हणतो. तर मग हे करण्यासाठीची संधी आपल्याला जैवविविधता कायद्याने दिली आहे. जैवविविधता म्हटले की आपल्याला काय सुचते? जैव विविधतेचा अर्थ जर खरोखर समजून घेतला तर एकही गोष्ट ह्या समितीशिवाय हलू शकत नाही. उद्या जर गावात येणारा एखादा उद्योग असेल, समजा 'सेज' असेल तर मग अशी जी टोल्यांची, पाड्यांची बनलेली कायदेशीर समिती असेल तर ती नोटीस देऊ शकते. अंबानीला पण नोटीस देऊ शकते की तुमच्या या उद्योगामुळे आमच्या इथल्या जैवविविधतेला धक्का लागणार आहे आणि तो लागणार नाही हे पहिले सिध्द करा, मगच तुम्हाला आमच्याकडून परवानगी मिळेल. हा अधिकार ह्या समितीला कायद्याने दिला आहे. आमच्याकडून परवानगी मिळाल्याशिवाय केंद्र सरकार किंवा राज्य सरकार तुम्हाला परवानगी देऊ शकत नाही. हा कायद्यामध्ये समाजातील सर्वात वंचित अशा घटकाला ताकद देणारी सोय आहे. ही ताकद मिळत असतानाच अजून एक मानवाच्या हिताची गोष्ट घडणार आहे. या कायद्यामुळे आदिवासी समाज, ज्या समाजामध्ये निसर्गाला इतर पशू, पक्षी, किटक यांना मिळवून टिकवून ठेवून जगण्याचं काही प्रेम शिल्लक आहे. सवय शिल्लक आहे, त्यांना हे बळ मिळणार आहे कायद्याचे, राज्यव्यवस्थेचे बळ मिळणार आहे.

पण आजची परिस्थिती अशी आहे, जी अतिशय वाईट आहे. ती अशी की हा कायदा झाला २००२ मध्ये. २००४ मध्ये यापासून त्याची अंमलबजावणी करावी, असा सरकारचा राजपत्रात

असतो तो आदेश झाला. लोकांना या कायद्याची माहिती नाही. चर्चाही होत नाही. अजून जर पलिकडे जाऊन विचार केला तर नियोजन करण्यासाठी जे कौशल्य लागते ते आदिवासींमध्ये नाही. आदिवासींना असणारे ज्ञान हे वेगळ्याप्रकारचे ज्ञान आहे. निसर्गासोबत जगत असताना ते सांभाळून ठेवावे, टिकवून ठेवावे, हे त्यांना माहिती आहे; पण रोप कसे लावावे हे ज्ञान त्यांना नाही. इतर मानवी समाजाने निसर्गामध्ये जो हस्तक्षेप केला आहे, हे असेच चालू राहिले तर फक्त विनाशच होईल. त्याचे नियोजन करण्याची आवश्यकता आहे. हे नियोजन कसे करायचे ह्याचे स्पष्टीकरण पण जैवविविधता या कायद्यात आहे. हा कायदा म्हणतो की जर नियोजन करायचे असेल तर सध्या अस्तित्वात ज्ञान गोळा करण्याची गरज आहे. ह्या कायद्याने असे सांगितले आहे की, जैवविविधते-विषयी जे ज्ञान आहे, त्याची नोंद करण्याची जबाबदारी या जैवविविधता समितीची आहे. त्याकरता या कायद्याने हे अवजार (tool) पण सांगितले आहे, ते म्हणजे जैवविविधता नोंद रजिस्टर. प्रत्येक गावाने स्वत:चे असे जैवविविधता नोंद रजिस्टर तयार करायचे आहे. यात काय करायचे आहे तर आपली जमीन, पाणी, शेती, पक्षी, प्राणी, किटक, समाज, संस्कृती, पध्दती या सर्वांचा साकल्याने विचार करुन, त्या आधारावर काय करायला पाहिजे आणि काय नाही करायला पाहिजे हे ठरवायचे. ही गोष्ट आदिवासींसाठी, पर्यावरणासाठी, एकूण मानवी समाजासाठी महत्त्वाची आहे. ही एक चांगली संधी आपल्याला या कायद्याद्वारे मिळाली आहे.

अजून एक महत्वाची गोष्ट म्हणजे हा कायदा फक्त आदिवासींसाठी केला नाही. असे होण्याची शक्यता होती, की तुम्ही पर्यावरणाच्या जवळ राहाता, तुम्हाला जंगलाची माहिती आहे. पाण्याचे स्रोत तुमच्याकडे आहेत, तर मग जैवविविधतेचे संरक्षण तुम्हीच करा. जसे वन्य जीव संरक्षणाच्या बाबतीत केले तसे. असे झाले असते तर फार मोठी चूक झाली असती. उलट या जैवविविधता संरक्षण कायद्याने सर्व लोकांना म्हणजे अगदी आदिवासी पाड्यापासून ते महानगरातील सर्व लोकांना जबाबदारी घेण्याची संधी दिली आहे. शहरांमध्ये जैवविविधता कमी आहे. अशातला भाग नाही; पण आता त्या पध्दतीने विचार होत नाही. पण जेव्हा तुम्ही त्यात पडता तेव्हा वेगवेगळ्या पध्दतीने विचार करायला लागता. इथल्या जंगलाबद्दल, प्राण्यांबद्दल, झाडांबद्दल त्यांच्यातल्या व्यवस्थेबद्दल जर समज तयार व्हायला लागली तर मग आदिवासी माणूस आदिवासी का राहिला याबद्दल समजू शकेल. मग आपण सगळे मिळून पर्यावरणाचे संरक्षण करण्यास तयार होऊ. आदिवासींच्या चांगल्या गोष्टींबद्दल आदर निर्माण होईल. या कायद्याच्या अंमलबजावणीकडे जर काळजीपूर्वक लक्ष दिले तर मानवी समाजामध्ये आपल्या चांगल्या गोष्टींबद्दल स्वाभिमान व चुकीच्या गोष्टी सोडून नविन उपयुक्त गोष्टी शिकण्याची क्षमता निर्माण होऊ शकेल.

आपण आदिवासींबद्दल बोलताना दोन महत्त्वाचे मुद्दे घेतले. एक म्हणजे गोंड आदिवासींमधले गोटुल आणि सहजीवन व त्याचा पर्यावरणाशी असलेला सहजसंबंध. दुसरे म्हणजे जैवविविधता कायदा २००२. ही एक मोठी घटनात्मक तरतूद आहे. आपण जिथे काम करत आहोत तिथे जास्तीत जास्त लोकांना फायदा होईल हे बघितले पाहिजे.

*प्रश्न : मी फक्त Confirm करु इच्छतो, आमचे एक वर्कशॉप झाले. हा कायदा हिमाचल प्रदेश आणि*

*एम. पी. मध्ये लागू झालेला आहे. महाराष्ट्रात नाही. तर एवढेच जाणून करायचे आहे.*

उत्तर : हा कायदा केंद्राने केला आहे आणि या कायद्याचे स्वरूप असे आहे की तो देशभर लागू होणारा कायदा आहे. इथे राज्याचा संविधानाप्रमाणे विषय नाही. काही कायदे असे असतात की केंद्र करते आणि राज्य सरकार अंमलात आणतात. त्याप्रमाणे कायदे बनवावेत. त्याच संदर्भातला आदिवासींचा पेसा कायदा. पंचायत राज दुरुस्तीचा आदिवासींचा जो कायदा आहे, तो असा कायदा होता राज्यसरकारने करायचा. एका वर्षात काही नाही केले तर जशाचा तसा तो लागू होईल. पण जैवविविधता कायदा तसा नाही. केंद्राने केला पूर्ण देशात, फक्त काश्मीर सोडून. काश्मीरसाठी वेगळी कायदेशीर व्यवस्था आहे. पण तो भाग सोडला तर बाकी सर्व ठिकाणी तो कायदा लागू झालेला आहे. प्रत्येक ठिकाणच्या Local bodies ना हा २००४ पासून अधिकार मिळालेला आहे.

ते आपल्या क्षेत्राकरता जैवविविधता संगठन करू शकतात. त्यांना कोणालाही विचारायची गरज नाही. त्यांनी जर ते कलम वाचले तर काही इतर कलमे त्या कायद्यातील अशी आहेत की राज्यसरकारनी काय करावे. अगदी ठामपणे, तुम्ही लक्षात घ्या की सगळीकडे हा कायदा लागू झाला आहे. तुमच्या ग्रामपंचायतीने, नगरपालिकेने जर हा ठराव पास केला तर केंद्र सरकार, राज्यसरकार तो कापून रद्द करु शकत नाही. ही समिती Constitutional समिती आहे. केंद्राने बनवलेल्या कायद्याप्रमाणे गठित केलेली समिती आहे. या प्रकारची ताकद आम्हाला आजपर्यंत कधीच मिळालेली नाही. त्यामुळे गोंधळ होतोय. न मागता मिळाल्यामुळे समजायला कठीण जाते. म्हणजे इतके एकदम हा कायदा पूर्ण देशात लागू आहे.

*प्रश्न : गावाला जर एखादं पेटंट मागायचं असेल, तर biodiversity act च्या प्रक्रियेमध्ये त्याचे काय नियम आहेत ?*

उत्तर : यामध्ये जी तरतूद आहे त्यात लोकांनी जैवविविधता नोंद रजिस्टर तयार करायचे असे म्हटले आहे. हे एक (tool) अवजार आहे. कलम ४१ मध्ये असे म्हटलंय की जैवसमित्या तयार होतील त्या या सगळ्या ज्ञानाचं नोंदी करण्याचं काम करतील. ज्ञान लोकांकडे आहे पण त्याची नोंद झालेली नाही. नियमामध्ये म्हटले की यामध्ये जे अवजार आहे ते लोकांचे जैवविविधता नोंद रजिस्टर म्हणजे नेमके काय याचा खुलासा करण्याकरता जैवविविधता प्राधिकरण तयार झालेले आहे. त्यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली. त्यांनी एक कमिटी नेमली. प्रा. माधव गाडगीळ हे त्याचे प्रमुख होते. त्यांनी त्याच्यावर खूप काम करुन, त्याची मार्गदर्शक तत्त्वे तयार केली. या कायद्यातील अजून एक सुंदर गोष्ट आहे की, जैव व्यवस्थापन समितीने जे करायचे आहे, हे करत असताना कोणी तुम्हाला आदेश नाही देणार. आतापर्यंत काय होतं की तुम्हाला जबाबदारी दिली; पण काय करायचे हे शासन, प्रशासन तुम्हाला सांगणार आणि तेवढंच तुम्ही करु शकता. या कायद्यात ते बदलले.

हा कायदा असे म्हणतो की ते तुम्हाला फक्त मार्गदर्शक तत्व देतील, दिशा निर्देश देतील, कसे करायचा याचा अंतिम निर्णय तुम्ही घ्यायचाय. त्यामुळे ही माहिति संकलन करायची आहे, ती कोणती करायची, कोणती करायची नाही, हे सुद्धा तारतम्य आपल्याला ठेवायला पाहिजे. उदा. ज्याच्यापासून औषधी निर्माण होते, त्याचे पेटंट घ्यायची गरज असते.

अशा प्रकारच्या कुठल्या प्रकारच्या वनौषधींची तुम्हाला माहिती आहे. ती तर तुम्ही माहितीच्या पुस्तकात ठेवली ती जर चोरी जायची शक्यता आहे. दुसरे लोक याचा चुकीचा उपयोग करतील. अशा गोष्टींमध्ये समज यायला हवी की अशी माहिती उघड पुस्तकामध्ये ठेऊ नयेत. अशी माहिती आमच्याकडे आहे एवढीच नोंद हवी. आमच्या वैदूला या रोगावरचा उपाय माहिती आहे. तो वनस्पतीपासून किंवा प्राण्यांपासून हे औषध तयार करतो एवढीच माहिती ठेवावी. ते काय आहे ते कधीच कोणाला सांगू नये. पेटंटचा कायदा स्वतंत्र आहे. या रजिस्टरमध्ये लिहिले की त्याचं पेटंट मिळेल असे नाही. पण या रजिस्टरचा उपयोग दुसऱ्या एका गोष्टीसाठी होईल, जिथे नेमकी गोष्टी नाही. औषधीसारखे जे ज्ञान आहे ते सगळ्यांना माहिती आहे. उदा. हळद - याच्यावर मोठी लढाई झाली. हळदीचे पेटंट घेण्याचा प्रयत्न झाला. जो भारतातले संशोधक, अभ्यासक यांनी हाणून पाडला ते यात यशस्वी ठरले.

कल्पना करा की जैव-विविधता नोंद रजिस्टर सारखी गोष्ट असती. भारतातल्या लोकांनी जी सगळ्यांना माहिती आहे ती लिहिली असती की जखम झाल्यानंतर आम्ही हळदीचा उपयोग करतो, काढा घेतो. त्याचा एक documetary proof म्हणून उपयोग होतो. पण आता जैवविविधता नोंद रजिस्टर हे कायद्याने अधिकृत असलेले अशा प्रकारचे माहितीचे पुस्तक आपल्याकडे आहे. पण हे तारतम्य ठेवायला लागेल की कोणती माहिती पूर्ण गुप्त राहील, कोणती माहिती आमच्या परवानगीने तुम्हाला पाहता येईल आणि कोणती माहिती अशी आहे, जगजाहीर करतो, की कुणीही घ्यावी व त्याचा उपयोग करावा. पण हे वर्गीकरण ठरवण्याचा अधिकार आपल्या लोकांचा असणार. यामध्ये दंड घेण्याबद्दल स्पष्ट म्हटलेलं नाही. पण व्यवस्थापन म्हटले की दंडाचा अधिकार येतोच. व्यवस्थापन करणार म्हणजे नियम बनवणार एक साधी गोष्ट, गवताला फुले आल्यावर बी येऊन पडल्याशिवाय गवत कापू नये. त्या आधी गवत कापले तर बी पडणार नाही, तर त्याचे पुनरुत्पादन होणार नाही. कोणी जर आधी गवत कापले तर त्याचे नियमन करण्यासाठी दंडच करावा लागेल. व्यवस्थापन करायचे तर, दंड करायचे प्रावधान आलेच, वेगळे म्हणण्याची गरज नाही. नियम तुम्हाला अधिकृतपणे ठराव करुन मंजूर लागतील. त्याला सरकारच्या संमतीची गरज नाही.

दुसऱ्या कायद्यात म्हटले आहे की जे गोळा करण्याचे शुल्क आहे collection fee ती घेण्याचा, ती ठरवण्याचा तुम्हाला अधिकार आहे. ते जेव्हा तुम्हाला संपर्क साधतील की हे देऊ की नको. जर देण्यासारखी गोष्ट असेल तर तुम्ही सांगा फी काय असेल. तुम्हाला पैशाची गरज असेल तर तुम्ही कुणालाही राज्यसरकारला, केंद्रसरकारला approach करु शकता, की आम्ही हे जैवविविधतेचं काम करतोय. आमची अशी रचना आहे कायद्याने झालेली. आम्हाला अमुक एक कामासाठी पैशाची गरज आहे. देता का बोला. तुम्हाला अधिकार आहे, कारण तुम्ही कायदेशीर समिती आहे.

*प्रश्न : या कायद्याने फार मोठा अधिकार दिलेला आहे. जैवविविधतेचं संवर्धन हा ही त्या मागचा उद्देश आहे. पण याचा दुरुपयोगही होऊ शकतो. असे होऊ नये म्हणून या कायद्यामध्ये काही तरतूद आहे का ?*

उत्तर : निश्चितच, प्रत्येक कायद्यात अशी तरतूद असते. या कायद्यात ती जास्त म्हणजे चांगली

आहे. त्यात स्पष्ट केलंय, ३ गोष्टी म्हणजे संरक्षण, टिकाऊ उपयोग आणि लाभामध्ये न्यायोचित वाटा. यात कुठेही जर गडबड होत असेल तर सरकारला हस्तक्षेप करण्याचा अधिकार आहे. ही ३ मुख्य सूत्रं त्यांनी सांगितलेली आहेत. नियम चुकीचा असेल तर बदलावा लागेल. पण या गोष्टी आहेत, ह्याच्या आधारावर त्या तपासल्या जाणार आहेत. इथे फरक पडतो का ? नियम चुकलेत, नियम बदलावे. टिकावू उपयोग होत नाही. तुम्ही कारवाई करु शकता, पण टिकावू उपयोग होण्याकरिता नियम चुकीचा आहे, तर सरकारला तो बदलावा लागणार. फक्त लोकांवर कारवाई करुन नाही चालणार. कायद्यातले हे सूत्र खूप महत्त्वाचे आहे.

आत्तापर्यंत कायदा बिनडोक असायचा आणि अंमलबजावणी करणारे त्याच्यापेक्षा बिनडोक अंमलबजावणी करायचे. कारण त्यातले एक सूत्र असते की कायदा हा एखाद्या उद्देशासाठी असतो. तो मुख्य असतो त्याचे बाकी तपशील जे असतात नियम वगैरे हे त्यासाठी असतात. मूळ उद्देशाचा विचार न करता जे अंमलबजावणी करतात ते मूळ उद्देशाच्या विरोधी करतात. ते होऊ नये म्हणून मूळ उद्देश स्पष्ट करुन टाकलाय व त्याच्याप्रमाणे पूर्ण अधिकार केंद्र आणि राज्यसरकारला आहे. जर एखादी चूक केली तर पहिले नियंत्रण असे आहे की समितीत काही ५-१० लोक नाहीत, तर पूर्ण गाव आहे. असे चुकीचे केले तर पहिले नुकसान पूर्ण गावाचेच होणार. कुणीतरी बोंबलतील, चार लोक काहीही करतील असं होणार नाही. नुकसान सगळ्यांचे होणार. त्या ऊपर कुणी लोभात पडलं, चुकीचे करायला लागले तर सरकारला अधिकार आहे. पण कुठंही त्याचा दुरुपयोग सरकारसुद्‌धा करू शकणार नाही. असा थोडा प्रयत्न यामध्ये आहे. असा फार मोठा गैरसमज आहे की लोकच गैरवापर करतात. सरकार सगळे बरोबर करत असते. हा समज सगळ्या कायद्यांमध्ये तो प्रतिबिंबित होतो. त्यात म्हणतात लोकांवरही सक्ती आहे. त्यांनी अमूक केले तर अमूक होईल. सरकारी अधिकाऱ्यांबद्दल लिहिलेलं असते की यांनी in good faith काही केलं तर त्यांना सगळी सूट आहे. तसं नाही. चुका सरकारही करतं म्हणून लोकांचं नियंत्रण राहील अशी व्यवस्था हवी आणि थोडा प्रयत्न या कायद्यामध्ये आहे. कायदा कसा असावा, त्यात काय सुधारणा हवी याकरता याच्याकडे चांगले उदाहरण म्हणून बघता येईल.

*प्रश्न : जैवविविधता समित्या ज्या गावांमध्ये निर्माण झाल्या. उद्या जर सरकारने एखादा मोठा प्रकल्प आणाण्याचा प्रयत्न केला. तर समित्यांची जबाबदारी काय राहील ?*

उत्तर : उदाहरण म्हणून मी रायगड मधील एस.इ.झेड. चे सांगितले. तुम्हाला समजेल असे उदाहरण घ्यायचे झाले तर चंद्रपूरला, अडानी प्रकल्प आलेला आहे, जेथे लोकांनी मोठे आंदोलन केलेले आहे. त्याच्याऐवजी जैवविविधता समिती जर लोकांनी गठित केली. त्या समितीने नोटीस पाठविली अडाणीला, तर कायदेशीर उत्तर द्यावे लागेल त्यांना. जनसुनवाई सारखे नाटक नाही. आपल्याला काय सांगायचे सांगा. ओरडा आणि निघून जा. हा कायद्याने दिलेला अधिकार आहे. तो घ्यायचा आणि वापरायचा. कायद्याचे ज्ञान, संविधान हे सगळे लोकांच्या पाठीमागे उभे राहू शकतात. पण ते करण्याची गोष्ट लोकांकडे दिलेली आहे. आज असे दिसते की लढणारे लोक

सुद्‌धा या कायद्याचा विचार 'लढण्याचे अवजार' म्हणून करत नाहीत. कारण जबाबदारी आहे. लोकांकडे जाऊन त्यांनी समित्या बनवाव्यात, व्यवस्थापनाची जबाबदारी घ्यावी. हे एका लढ्यापुरते नाही, कायमस्वरूपी आहे. आपण काय चुकीचे करतो हेही दुरुस्त करावे लागणार आहे. असे नाही की फक्त अडानी आणि एस.इ.झेड. मुळे सगळे बिघडते. आम्ही चुकीचे वागतो. पण दुसऱ्यांनी काय करावे हे सांगण्याचा सगळ्यांना उत्साह आहे; पण आम्ही काय चूक करतो. तेही दुरुस्त करावे लागणार, असे सगळे मानवशास्त्रीय पदर आहेत. ती समिती बनली कायद्याप्रमाणे बनली व लोकांच्या संमतीने आणि त्यांनी जर ते अवजार म्हणून वापरायचे ठरवले तर चुकीच्या गोष्टींच्या विरोधात तर निश्चितपणे आणि जास्त प्रभाविपणे वापरु शकतात.

*प्रश्न : कुठेतरी ज्ञानाचा वापर होतोय याची शाश्वती वाटते काय ? याचे नियम बदलायची गरज आहे काय ?*

उत्तर : या नियमांमध्ये बदल करण्याची गरज नेहमीच असते, हे तुम्ही पाहिले लक्षात घ्या. कोणताही कायदा परिपूर्ण नसतो, कोणतेही नियम परिपूर्ण नसतात. म्हणून त्यात काही चांगल्या गोष्टी नसतातच का ? असे नाही. काही चुकीच्या असतात. ज्या दुरुस्त करायच्या असतात. चांगल्या गोष्टी घेऊन तुम्हाला संधी मिळालेली असते ती आणखी आपली ताकद वाढवा किंवा त्या दिशेने प्रयत्न करा. हे सरसकट सगळ्या कायद्याच्या बाबतीत आपण लक्षात ठेवायचे. तुम्ही म्हणता तसे होऊ शकते; पण त्यावर नियंत्रण कोण करेल ? ज्या प्रकारची व्यवस्था आहे त्यामध्ये ते होतच आहे. लोक नाहीत, लोकांचे नियंत्रण नाही, monitoring नाही, खऱ्या अर्थाने जर समाज जागृत झाला, त्याला अधिकार मिळाले तर तो काहीतरी प्रयत्न करु शकेल. किती होतील, काय होतील हे अनुभवानं शिकावं लागेल. घटना, रचना यात दुरुस्त्या कराव्या लागतील. कुठलीच गोष्ट अंतिम नाही. सुरुवात होणे यात संधी आहे. या जैवविविधता समित्या चुकीच्याही बनू शकतात. म्हणजे आज होत नाहीत पण असे व्हायची शक्यता आहे, की राज्यसरकारने फतवा काढला. जसे वनाधिकार समित्यांच्या बाबतीत झाले.

निवडणुकीच्या आधी पट्टे वाटपाचा फायदा आम्हाला पाहिजे होता. म्हणून १ मे ला सगळ्या ग्रामपंचायतींची विशेष सभा घ्यावी आणि वनहक्क समित्यांचे गठन करुन टाका, असे आदेश काढल्याबरोबर धडाधड समित्या बनल्या. कित्येक लोकांना आपण त्या समित्यात आहोत हेही माहिती नाही. कोणाला घ्यायचे, कसे घ्यायचे, कोणी ठरवलं हे काहीच माहिती नाही. जैवविविधता समित्या सुद्धा अशा कायदेशीर बनू शकतात. पण आता संधी आहे की असे व्हायच्या आधी, जिथे जिथे आपण काम करतो तिथे सांगा की; आपली स्वत:ची कायद्याने आपल्याला पाहिजे तशी समिती बनवून घ्या. एकदम सगळ्या देशात, राज्यात, जगात जे होईल ते आम्ही करू शकत नाही. जी क्षमता आहे, मर्यादा आहे त्याप्रमाणे आपण करु शकतो. त्याने काय होईल की, राज्यसरकारने धडाधड असं करायला पायबंद बसेल. किमान महाराष्ट्रातल्या उत्तर, पूर्व, दक्षिण, पश्चिम, दक्षिण सगळीकडे १०-१० जरी समित्या अशा असल्या तरी खूप झाले. अशा पद्‌धतीने झाले पाहिजे. हे बघा आमचा अनुभव असा आहे; पण तसे नसेल तर, सरकार तेच खरे ठरेल. आम्हाला सगळं ज्ञान आणि अनुभव असून सुद्‌धा सरकारच्या

पातळीवर ते राजव्यवस्थेमध्ये आम्ही काहीही हस्तक्षेप करू शकत नाही. हा असा दुबळेपणा सोडण्याकरता समित्या बनवणे आणि अनुभवाच्या आधारे ती चालवणे आणि सरकारचा काय दोष आहे, त्याचा अभ्यास करुन ते दूर करणे, पण आपण काय करायला पाहिजे ते न करता सरकारने काय करावे असे म्हणून आम्हाला ताकद कधी मिळू शकत नाही, हे मात्र पक्के आहे.

*प्रश्न : जे संयुक्त व्यवस्थापन समित्या झाल्या त्यामध्ये काय भाग येतो आणि मग समित्या समित्या यात काही फरक येईल का ?*

उत्तर : फरक येईल इतक्या प्रकारच्या समित्या असतात. चांगले उदाहरण घेतले. जंगल आहे, आदिवासी आहे किंवा संयुक्त व्यवस्थापन समिती आहे. जैव विविधता समिती पुन्हा वेगळी त्यात भांडण निर्माण होण्याची किंवा लावण्याची शक्यता आहे. कारण तुम्ही भांडाल तर तुमची ताकद कमी होईल म्हणून ही समिती स्थापन करताना आपल्यासारख्या लोकांनी काळजी घेतली पाहिजे. अशा सगळ्या समित्या एकच झाल्या पाहिजेत. त्या वेगवेगळ्या राहाता कामा नाही. त्यांना म्हटले पाहिजे की जैव-विविधता समिती नव्हती म्हणून वनव्यवस्थापन समिती वेगळी होती. आदिवासींना नीट कळते, समजते वन आणि वन्यजीव वेगळे नाहीत. आदिवासी वन आणि वन्यजीव एकच समजतो.

पण सरकार एवढे ज्ञानी आहे की ते कायदा करते. वनव्यवस्थापनाचा कायदा वेगळा, वन्य जीव संरक्षणाचा वेगळा. खरे वनाच्या कायद्यामध्येच वन्यजीवाचे संरक्षण गृहीत असले पाहिजे. हे अशा प्रकारे चुकीच्या गोष्टी सरकार करु शकते. त्या आदिवासीला, गाव-समाजाला, शेतकऱ्याला, महिलांना हे समजत असेल तर दुरुस्ती दिल्ली आणि मुंबईपासून होणार नाही. तर ती दुरुस्ती आमच्या गाव, टोले-पाडे येथून होईल. त्यासाठी आम्हीच सरकार बनावे लागेल. यासाठी मी ज्या गावाबरोबर काम करतो, त्या मेंढांनी दिलेली घोषणा त्यापासून खूप शिकता येतेय. 'की दिल्ली, मुंबईत आमचे सरकार, आमच्या गावात आम्हीच सरकार.' त्यांनी आपल्या ताकदीने सरकार बनवलंय. वनधिकार कायदा जैवविविधता कायदा, रोजगार हमी कायदा, ग्रामदानाचा कायदा हे सर्व कायदेच म्हणतात 'आम्हीच सरकार बनवणार.'

हा प्रश्न आता आपल्या बाजूला आलाय की सरकार बनणार की नाही. मग आमच्यातला कमी-पणा शोधावा लागेल, की आम्ही हे का करु शकत नाही. मग ती दुरुस्ती करावी लागेल. प्रक्रिया करावी लागेल. ह्याची गरज आता या कायद्यांमधून आणखी जाणवायला लागली पाहिजे. आधी असे वाटत होते, स्वयंसेवी संस्थांना की कायदा बदलला की सगळे काही होईल. पण आता अनुभवातून असे दिसतेय की हे होत नाही. कायदा झाला पाहिजे असं आम्हीच म्हणत होतो. कुठेतरी दुसऱ्या गोष्टींची सुद्धा तपासणी करावी लागेल. पण ते करत असताना व्यवस्थापन शास्त्र कसे असावे, त्या रचना कशा असाव्यात, त्या परस्पर विरोधी नसावी यासाठी काय काळजी घ्यावी?

संयुक्त वनव्यवस्थापन समितीचे गठन वन विभागाने केलंय. गावातील लोकांना समित्या गठन करण्याचा कुठलाही अधिकार नाही. ते फक्त अर्ज करू शकतात, डी. पी. ओ. ला. तो फक्त गठीत झाली की नाही झाले हे सांगू शकतो.

• • •

(पृष्ठ क्र. १६ वरुन)

**डॉ. हेमंत आपटे**

अतिशय प्रभावीपणे पारंपरिक औषधी ज्ञान आणि त्याचा उपयोग याविषयीचे विचार डॉ. सराफांनी मांडले. नेहमी मानवशास्त्राच्या अभ्यासामध्ये शिकत असतो. त्यावेळला Tribal Society is Simple Society असा एक शब्द वापरला जातो आणि आपण शहरात राहणारे आजार होतोय कुठून ? आजाराचं मूळ कुठे आहे ? तो आजार होऊ नये यासाठी काय आणि झाले तर त्यासाठी काय ? याचा विचार आपण जेवढा करत नाही तेवढा आदिवासी लोक करतात. कारण तसा जर केला नसता तर आदिवासी हा केव्हाच या भुतलावरुन नष्ट झाला असता. जर आपल्याला असं वाटत असेल की Modern Medicine हे एकच आपल्या आरोग्याच्या दृष्टीने उत्तर आहे. असं जर असतं तर ब्रिटीश येण्यापूर्वी भारत केव्हाच संपून गेला असता. पण आपण आपल्या आयुर्वेदाच्या आणि पर्यायाने ज्या आपल्या सांस्कृतिक वारशाचं जतन केलं आहे आणि वाढवण्याचा प्रयत्न करतो आहोत, त्याच्यावर आता डॉ. सराफांनी जो उहापोह केला, जी काही मतं मांडली; मला वाटतं ही अत्यंत उपयुक्त मत आहेत.

आदिवासींच्या प्रश्नावरती जेव्हा आपण आरोग्य हा एक केंद्रबिंदू मानून चर्चा करत असतो त्यावेळेला आरोग्याचे काही प्रश्न आहेत. त्याच्या आकडेवारीकडे लक्ष देणं फार गरजेचं आहे. साधारणपणे वृत्तपत्रातून येणाऱ्या बातम्या जर आपण वाचल्या तर आदिवासी आणि कुपोषण या दोन्ही गोष्टी अगदी कायमस्वरूपी वृत्तपत्तातून आपल्या समोर येत असतात. भारतातल्या ७०% स्त्रियांना रक्तक्षय किंवा ॲनिमिया हा भारतामध्ये आहे. आदिवासी देखील त्याला अपवाद नाही. दहा वर्षापूर्वी जेव्हा जव्हार, मोखाड्यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रात जी काही माहिती आली, त्याचे विश्लेषण करत होतो; तेव्हा असे लक्षात आले ५०% ० ते ५ या वयोगटातील मुलांचे जे मृत्यू आहे. त्याचे कारण म्हणजे वेळे अगोदर झालेली डिलीव्हरी आणि कमी वजनाचे बाळ जन्माला येणे. माता मृत्यू हेही आहेत. त्याचेही कारण कुपोषण आणि रक्तक्षय हे आहे. मलेरीया, TB, leprosy आणि इतर Communicable diseases आपण ज्याला म्हणतो त्यांचेही प्रमाण आदिवासी भागांमध्ये बऱ्यापैकी आहे. लैंगिक आजार हा एक नव्याने दिसून येणारा जो एक घटक आहे. त्यांची बरीचशी कारणं अशी लक्षात आली की, जव्हार, मोखाड्यातून ज्यांना एकंदर आर्थीक परिस्थितीमुळे बऱ्याच कुटुंबांना स्थलांतरीत व्हावे लागते. आता तो स्थलांतराचा कालावधी जो असतो हा प्रत्येक ठिकाणी वेगवेगळा असतो.

• • •

# जैवसंरक्षणाविषयी कायद्यांची थोडक्यात माहिती जैवविविधता कायदा २००२ व जैवविविधता नियम २००४

हा कायदा जैवविविधतेचे संरक्षण, जैविक संसाधनांचा शाश्वत वापर आणि अशा वापरापासून व संबंधित ज्ञानापासून मिळणारे फायदे व त्यांची वाटणी याविषयी आहे. हा कायदा भारतामध्ये सर्वत्र लागू आहे.

**१. या कायद्यात उपयोग केलेल्या काही महत्त्वाच्या शब्दांच्या (terms) व्याख्या काय आहेत ?**

या कायद्याप्रमाणे :

- 'जैवविविधता' याचा अर्थ जीव-जंतुंची विविधता, पर्यावरण व्यवस्थेतील विविधता, प्रजातींमधील विविधता आणि नैसर्गिक परिसंस्थांमधील विविधता.
- 'जैव संसोधने' याचा अर्थ वनस्पती, प्राणी व सूक्ष्म जीव, त्यांचे वेगवेगळे भाग, त्यांची अंतर्गत जनुकीय सामग्री व यापासून घेतलेले वा घेतले जाऊ शकणारे उत्पादन किंवा मूल्य. जैव संसाधनांच्या व्याख्येमध्ये मनुष्यप्राण्याच्या जनुकीय सामग्रीचा समावेश नाही.
- 'जैव सर्वेक्षण व जैव विनियोग' याचा अर्थ कोणत्याही उद्देशाने जीव, जाती-प्रजाती, जनुकीय सामग्री आणि जैविक संसाधनांचे भाग व त्यांचे अर्क यांचे सर्वेक्षण करणे व ते गोळा करणे. यामध्ये संसाधनांच्या विशेष लक्षणांचे वर्णन व त्यांची सूची बनविणे आणि 'बायो-ॲसे' यांचाही समावेश होतो.
- 'स्थानिक संस्था' म्हणजे ग्रामपंचायती व नगरपालिका. जिथे ग्रामपंचायती व नगरपालिका नाहीत अशा ठिकाणी लोकांनी कोणत्याही कायद्याअंतर्गत स्वयंशासन संस्था स्थापन केलेली असेल, अशा संस्थेला 'स्थानिक संस्था' म्हणतात.

**२. या कायद्यामध्ये कोणते प्राधिकरण व कोष स्थापन करण्याची तरतूद केलेली आहे ?**

निर्णय घेणारे गट हे पुढील तीन पातळ्यांवर स्थापन केले जातात. राष्ट्रीय जैवविविधता प्राधिकरण (नॅशनल बायोडाव्हर्सिटी ॲथॉरिटी, एन.बी.ए.), राज्य जैवविविधता बोर्ड (स्टेट बायोडाव्हर्सिटी बोर्ड, एस.बी.बी.) व गाव पातळीवर जैवविविधता व्यवस्थापन समिती (बायोडाव्हर्सिटी मॅनेजमेंट कमिटी, बी.एम.सी.) प्रत्येकाची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे.

### एन.बी.ए. (कलम ८)

केंद्र सरकार चेन्नईमध्ये एन.बी.ए. स्थापन करेल, ज्याचे सदस्य खालीलप्रमाणे असतील.

१) अध्यक्ष - एक प्रतिष्ठित व्यक्ती जिला जैवविविधतेविषयी योग्य माहिती व अनुभव आहे.

२) तीन सदस्य – एक सदस्य अनुसूचित जनजाती मंत्रालयातील असेल व दोन सदस्य पर्यावरण आणि वन मंत्रालयाचे प्रतिनिधी असतील. यांच्यातील एक वनखात्याचे अॅडिशनल डिरेक्टर जनरल (ए.डी.जी.) किंवा डिरेक्टर जनरल (डी.जी.) असले पाहिजेत.

३) सात सदस्य हे केंद्र सरकारच्या अशा मंत्रालयांचे प्रतिनिधी असावेत, जिथे पुढील विषयांवर काम केले जाते. कृषी संशोधन व शिक्षण, जैव तंत्रज्ञान, महासागर विकास, कृषी व सहकार, भारतीय औषध पद्धती व होमिओपॅथी, विज्ञान व तंत्रज्ञान, वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन.

४. सरकारी प्रतिनिधींव्यतिरिक्त पाच सदस्य

कृषी जैवविविधता व कृषी पिकांच्या जंगली प्रजातीसंबंधित मुद्यांकडे व अन्य मुद्यांकडे लक्ष देण्यासाठी एन.बी.ए. समित्या स्थापन करू शकते. (कलम १३)

### एन.बी.ए. चे मुख्य कार्य (कलम १८)

१) भारतातील जैवविविधता आणि संबंधित ज्ञानाच्या (ज्यामध्ये आय.पी.आर. समाविष्ट आहे) विदेशींकडून (व्यक्ती/संस्था) होणाऱ्या वापरावर नियंत्रण ठेवणे, वापरास मंजुरी वा नकार देणे, तसेच वापरास मंजुरी देताना फायद्यांचे समान वाटप होत आहे, हे पाहणे.

२) एन.बी.ए. कडून पूर्वपरवानगी न घेता भारतातील संसाधनांवर आधारित आय.पी.आर. जर कोणी परदेशात घेतले असतील, तर त्यांच्याविरुद्ध लढणे.

३) शासनाने परवानगी देताना घातलेल्या शर्ती पूर्ण केल्या जात नसतील किंवा नैसर्गिक संसाधनांचे नुकसान होत असेल तर दिलेली परवानगी रद्द करणे.

४) केंद्र सरकारला जैव विविधता संरक्षण व शाश्वत उपयोग आणि योग्य लाभ वितरणाविषयी सल्ला देणे.

५) जैवविविधतेच्या वेगवेगळ्या पैलूंची माहिती एकत्र करुन ती प्रकाशित करणे.

६) विविध राज्यांच्या एस.बी.बी. च्या कार्यामध्ये सुसूत्रता आणणे आणि त्यांना तांत्रिक सल्ला देणे.

७) आवश्यकतेप्रमाणे राज्यसरकारांना बी.एच.एस. (बायोडायव्हर्सिटी हेरिटेज साईट) विषयी सल्ला देणे (पत्र ९ पहा.)

### एस.बी.बी. (कलम २२)

राज्य सरकार एस.बी.बी. स्थापन करेल. त्याचे खालीलप्रमाणे सदस्य असतील :

१) एक अध्यक्ष

२) राज्य सरकारी विभागातील जास्तीत जास्त पाच प्रतिनिधी.

३) संबंधित विषयांवरील तज्ज्ञांमधून नियुक्त केलेले जास्तीत जास्त पाच सदस्य.

**एस.बी.बी. कार्य (कलम २३)**

१) राज्य सरकारला जैवविविधता संरक्षण व शाश्वत वापर आणि योग्य लाभ वितरण याविषयी सल्ला देणे.

२) भारतीय अर्जदारांना कोणत्याही जैविक संसाधनांचे व्यापारी उपयोग किंवा जैव सर्वेक्षण व जैव विनियोगासाठी परवानगी देणे अथवा नाकारणे.

३) इतर आवश्यक कार्य करणे.

**बी.एम.सी. (कलम ४१)**

प्रत्येक स्थानिक संस्थेला एक बी.एम.सी. स्थापन करणे अनिवार्य आहे. आपल्या परिसरामधील जैवविविधता संरक्षण व शाश्वत उपयोग, व जैवविविधता नोंदवही ठेवण्याची जबाबदारी बी.एम.सी. वर राहील. यामध्ये वन्यजीवांच्या नैसर्गिक आवास स्थळांची सुरक्षा, कृषि जैवविविधता संरक्षण, सूक्ष्म जंतूंचे संरक्षण व जैवविविधतेशी संबंधित पारंपरिक ज्ञानाच्या नोंदीचा समावेश होतो.

बी.एम.सी. मध्ये सात सदस्य असतील. त्यापैकी कमीत कमी एक तृतीयांश महिला सदस्य आणि कमीत कमी अठरा टक्के (१८%) अनुसूचित जाती व जमातींचे प्रतिनिधी असतील.

ज्यांना व्यापारी हेतुसाठी समितीच्या कार्यक्षेत्रामध्ये येणारी जैविक संसाधने गोळा करायची आहेत अथवा वापरायची आहेत त्यांच्याकडून बी.एम.सी. शुल्क घेऊ शकते.

एन.बी.ए. व एस.बी.बी. ला कोणत्याही संसाधनांच्या उपयोगासंबंधी निर्णय घेण्याच्या अगोदर त्या क्षेत्रातील बी.एम.सी. चा सल्ला घेणे अनिवार्य आहे.

वर दिल्याप्रमाणे राष्ट्रीय, राज्य व स्थानीय स्तरावर एक-एक जैवविविधता कोष बनविण्याची तरतूद आहे. यासाठी वेगवेगळ्या स्त्रोतांमधून पैसा एक केला जाऊ शकतो, जो कायद्यांतर्गत दिलेल्या कार्यावर खर्च करता येतो, ज्यामध्ये स्थानिक लोकांमध्ये योग्य रूपात लाभ वितरीत करणेही सामील आहे. (खालील क्रमांक ६ पहा.)

**३. स्थानिक जैवविविधता घटकांचा उपयोग करायचा असल्यास, त्यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने या कायद्यात कोणत्या तरतुदी आहेत ?**

संशोधन, व्यापारी उपयोग अथवा अन्य कोणत्याही उद्देशासाठी खालील श्रेणीतील व्यक्ती/ संस्थांना भारतातील जैवविविधता अथवा पारंपरिक ज्ञानाचा उपयोग करायचा झाल्यास त्यांना एन.बी.ए. ची पूर्वपरवानगी घ्यावी लागते. (कलम ३)

१) जो भारतीय नागरीक नाही.

२) अनिवासी भारतीय (आयकर अधिनियम १९६१, कलम २ मध्ये केलेल्या व्याख्येप्रमाणे)

३) अशी कंपनी, मंडळ किंवा संस्था जिची : भारतात रीतसर नोंदणी केलेली नसेल.

भारतात रीतसर नोंदणी केली असेल; परंतु त्याच्या व्यवस्थापन अथवा भागभांडवलामध्ये परदेशी व्यक्ती/संस्थांचा सहभाग असेल.

**जैविक संसाधनांच्या उपयोगासाठी परवानगी मिळविण्याच्या कार्यपद्धतीचे विस्तृत वर्णन नियमांमध्ये दिले आहे.**

भारतात मिळणाऱ्या किंवा येथून उपलब्ध झालेल्या जैविक संसाधनांवर आधारित संशोधनाचे परिणाम एन.बी.ए. च्या पूर्वपरवानगीशिवाय वरील यादीतील व्यक्ती किंवा संस्थांना कळविता येणार नाहीत (कलम ४)

**अशा प्रकारच्या कोणत्याही 'तिऱ्हाईत व्यक्तीला' (थर्ड पार्टीला) माहिती देण्याची पद्धती नियमांमध्ये विस्तृत स्वरूपात दिलेली आहे.**

जर अशा उपयोगामुळे जैवविविधतेचे नुकसान होणार असेल, स्थानिक लोकांच्या उपजीविकेवर परिणाम होणार असेल किंवा अन्यप्रकारे राष्ट्रीय हितास बाधा येणार असेल, तर जैविक संसाधनांच्या वापरासाठीचा अर्ज नामंजूर केला जाऊ शकतो.

भारत आणि अन्य देशांच्या सरकाराद्वारा प्रायोजित संस्थांनी सहयोगाने संशोधन केले असल्यास जैविक संसाधने आणि त्यांविषयीच्या ज्ञानाचे हस्तांतर वा देवघेव करण्यासाठी वरील तरतुदी लागू नाहीत. अशा तऱ्हेने सहयोगाने संशोधन करण्यासाठी केंद्र सरकारची मान्यता मिळविणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे ते केंद्र सरकारने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार असणे आवश्यक आहे. (कलम ५).

काही जैविक संसाधने, ज्यांची नेहमी खरेदी-विक्री होते, उदा. सर्वसाधारणत: निर्यात केली जाणारी पिके, यांना वरील तरतुदींमधून केंद्र सरकार सूट देऊ शकते. यांची यादी तयार करुन अधिकृत गॅझेटमध्ये प्रसिद्ध केली गेली पाहिजे तसेच व्यापारीकरणास योग्य अशा उत्पादनांचा किंवा प्रक्रियांचा विकास करण्यासाठी आयात केलेल्या संसाधनांवर संशोधन करणार नाही, असे आयातदाराने जाहीर केले पाहिजे.

**४. भारतीयांना जैवसंसाधनांचा उपयोग करायचा असल्यास हा कायदा अशा उपयोगावर नियंत्रण कसे ठेवतो ?**

भारतीय नागरिक किंवा कंपनी किंवा संस्था, जिची नोंदणी भारतात झालेली असून तिच्यात परदेशी सहभाग नाही, यांपैकी कोणीही एस.बी.बी. ला प्रथम कळविल्यानंतरच कोणतीही जैविक संसाधने गोळा करून ती व्यापारी उपयोग, जैविक सर्वेक्षण किंवा जैविक विनियोगासाठी वापरू शकतात (कलम ७)

जैवविविधता संरक्षणास, शाश्वत उपयोगास किंवा लाभांची यथायोग्य वाटणी करण्यास एखादा उपक्रम असमर्थ असल्याचे एस.बी.बी. च्या निदर्शनास आले, तर स्थानिक संस्थांशी चर्चा करुन व स्वत: चौकशी करून एस.बी.बी. असा उपक्रम रोखू शकतात किंवा त्यावर निर्बंध घालू शकतात (कलम २४).

जैविक संसाधनांचे उत्पादन करणाऱ्या स्थानिक लोकांना किंवा समूहांना व पारंपरिक पद्धतीने काम करणाऱ्या स्थानिक वैदूंना व हकिमांना ही तरतूद

लागू नाही (कलम ७)

**५. या कायद्याने बौद्धिक संपदा अधिकारास (इंटलेक्चुअल प्रॉपर्टी राइटस्, आय.पी.आर. पेटंट) कसे नियंत्रित केले जाते ?**

भारतात गोळा केलेल्या संसाधनांवर आधारित संशोधन किंवा माहिती वापरून लावलेल्या शोधासाठी भारत/परदेशात आय.पी.आर. घ्यायचे झाल्यास असा अर्ज करण्यापूर्वी एन.बी.ए. ची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य आहे (कलम ६ (१).) अशी पूर्वपरवानगी मिळविण्याच्या प्रक्रियेचे वर्णन नियमांमध्ये दिलेले आहे. जर कोणी पेटंट किंवा इतर प्रकारच्या आय.पी.आर. साठी अर्ज केला, तर एन.बी.ए. ला तीन महिन्यांत या अर्जाबाबत निर्णय घ्यावा लागतो. अर्जदाराने सर्व शर्ती पूर्ण केल्या असल्याची खात्री पटल्यावरच एन.बी.ए. अर्जदारास आय.पी.आय. साठी अर्ज करण्यास परवानगी देते (कलम १८).

वनस्पती प्रजाती व शेतकरी अधिकार कायदा २००१ (प्लॅंट व्हरायटीज ॲन्ड फार्मर्स राईटस् ॲक्ट २००१) अंतर्गत ज्या व्यक्तींनी वनस्पती प्रजातींबाबत आय.पी.आर. साठी अर्ज केला असेल अशा व्यक्तींना या तरतुदी लागू होत नाहीत (कलम ६(३).)

आय.पी.आर. साठी अर्ज आल्यास एन.बी.ए. चौकशी करते आणि गरज असल्यास याविषयी विचार करण्यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन करू शकते. एन.बी.ए. या समितीच्या सल्ल्याने अर्जास मंजुरी देईल अथवा नाकारेल. कोणत्याही अर्जास मंजुरी दिल्यानंतर त्याबाबत सार्वजनिक सूचना देणे. एन.बी.ए. वर बंधनकारक आहे. कलम १९ (३) व (४) आणि २० (४)

**६. स्थानिक समुदायांबरोबर लाभाच्या वाटणीबाबत हा कायदा काय सांगतो ?**

जेव्हा जैवसंसाधनांचा उपयोग किंवा आय.पी.आर.ला मंजुरी दिली जाते, तेव्हा अशा उपयोगापासून मिळणारा लाभ योग्य तऱ्हेने वाटला जातो आहे हे पाहण्याची जबाबदारी एन.बी.ए. किंवा एस.बी.बी. राहील. उपक्रमातून होणारा लाभ अर्जदार आणि 'लाभाचे दावेदार' यांच्यात वाटला जाईल. लाभाचे दावेदार म्हणजे अशा स्थानिक व्यक्ती किंवा समुदाय, ज्यांनी त्या जैवसंसाधनांचे संवर्धन केले असेल आणि त्यांच्यावर आधारीत माहिती, वहिवाट आणि नाविन्यपूर्ण उपयोग योजिले असतील. अर्जदार, संबंधित स्थानिक संस्था व लाभाचे दावेदार यांच्या परस्पर सहमतीने लाभ वाटपाच्या शर्ती निश्चित केल्या जातील. कलम २१ (१)

**लाभ वाटप खालील पद्धतीने होऊ शकते. कलम २१ (२)**

१) आय.पी.आर. चे अर्जदार व एन.बी.ए. यांच्यातील संयुक्त अधिकाराने किंवा अर्जदार व लाभाचे दावेदार यांच्यातील संयुक्त अधिकाराने.

२) लाभाच्या दावेदारांना केलेले तंत्रज्ञानाचे हस्तांतर.

३) जेथे लाभाच्या दावेदारांचे राहणीमान सुधारेल अशा ठिकाणी संशोधन, विकास आणि उत्पादन केंद्रे उभारणे.

४) जैवसंसाधनांवर संशोधन व विकास कार्यामध्ये भारतीय वैज्ञानिक, लाभाचे दावेदार व स्थानिक लोक यांना सामील करून घेणे.

५) लाभाच्या दावेदारांच्या मदतीसाठी भांडवली निधीची स्थापना करणे (व्हेंचर कॅपिटल फंड).

६) लाभाच्या दावेदारांना पैशाच्या व इतर स्वरूपात लाभ उपलब्ध करून देणे.

ज्या व्यक्ती/संस्थांपासून जैव संसाधने अथवा त्याविषयी माहिती प्राप्त झालेली आहे, अशांना एन.बी.ए. जिल्हा प्रशासनामार्फत ठरलेली रक्कम थेट देईल; परंतु जेव्हा जैविक संसाधनांची जपणूक करणारी व्यक्ती अथवा व्यक्तींचा समूह अथवा संस्था स्पष्टपणे ठरविता येत नाही. तेव्हा ही रक्कम एन.बी.एफ. (नॅशनल बायोडायव्हर्सिटी फंड) मध्ये जमा केली जाईल.

**७. कायद्यामध्ये पारंपरिक ज्ञानाच्या सुरक्षिततेसाठी कोणत्या तरतुदी आहेत ?**

या कायद्याने स्थानिक लोकांच्या जैवविविधतेसंबंधीच्या ज्ञानाचा आदर करण्याची आणि त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी केंद्र सरकारवर सोपविलेली आहे (कलम ३६ (५)).

यासंदर्भात जैवविविधता नियमांमध्ये ऑगस्ट २००८ पर्यंत कोणत्याही तरतुदी केलेल्या नाहीत.

**८. या कायद्यांतर्गत जैवविविधतेच्या संरक्षणासाठी अन्य कोणत्या तरतुदी आहेत ?**

कायद्यामध्ये जैवविविधता संरक्षणाविषयी केंद्र सरकारच्या जबाबदाऱ्यांची यादी दिलेली आहे.

१) जैवविविधता संरक्षण, संवर्धन व त्यांचा शाश्वत उपयोग या उद्देशांसाठी राष्ट्रीय स्तरावर धोरण, योजना व कार्यक्रम तयार करणे. यामध्ये जैवविविधता संसाधनांनी परिपूर्ण अशी क्षेत्रे ओळखून त्यावर लक्ष ठेवणे, संसाधनांचे त्यांच्या क्षेत्रात किंवा बाहेर संवर्धन करणे व जैवविविधतेच्या विषयाबद्दल जागृती निर्माण करण्यासाठी संशोधन, प्रशिक्षण व लोकशिक्षण यांना प्रोत्साहन देणे. (कलम ३६ (१)).

२) ज्या क्षेत्रामध्ये जैवविविधता असुरक्षित आहे, अशा क्षेत्रामध्ये राज्य सरकारला योग्य कार्यवाही करण्याचे निर्देश देणे (कलम ३६ (२)).

३) ज्या योजनांच्या जैवविविधतेवर दुष्परिणाम होण्याची शक्यता आहे अशा योजनांचा पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांचा अंदाज घेणे. कलम ३६ (४) (१)

***यासंदर्भात जैवविविधता नियमांमध्ये ऑगस्ट २००८ पर्यंत कोणत्याही तरतुदी केलेल्या नाहीत.***

४) जैवतंत्रज्ञानाचा वापर करून जनुकीय बचत केलेले जीव (जेनेटिकली मॉडिफाइड ऑर्गनिझम्स, जी.एम.ओ.) मोकळे केल्यामुळे मानवी स्वास्थ्याला आणि जैवविविधतेला संभाविणाऱ्या धोक्यांवर नियंत्रण ठेवणे आणि त्यांचे व्यवस्थापन करणे. कलम ३६ (४)

***यासंदर्भात जैवविविधता नियमांमध्ये ऑगस्ट २००८ पर्यंत कोणत्याही तरतुदी केलेल्या नाहीत.***

५) ज्या प्रजाती लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत, त्यांना 'संकटग्रस्त प्रजाती' घोषित करणे आणि त्या गोळा करण्यावर नियंत्रण ठेवणे किंवा प्रतिबंध करणे, आणि या जाती-प्रजातींची पुनर्स्थापना करण्यासाठी व सुरक्षिततेसाठी प्रयत्न करणे. संबंधित राज्य सरकारशी याबाबत सल्लामसलत करणे (कलम ३८)

***एखाद्या प्रजातीला संकटग्रस्त म्हणून घोषित करण्यासाठीची प्रक्रिया जैवविविधता नियमांमध्ये दिलेली आहे.***

६) एन.बी.ए. च्या सल्ल्याने संस्थांना वेगवेगळ्या श्रेणीतील जैवसंसाधनांची 'संग्रह संस्था' घोषित करणे. या संग्रह संस्था जैविक सामग्रीस सुरक्षित ठेवतील. कोणीही नवीन जाती, प्रजाती किंवा इतर प्रकारचा शोध लावल्यास त्याने संग्रह संस्थांना ही माहिती देणे आवश्यक आहे आणि संस्थेत त्या जाती-प्रजातींचे नमुने जमा करणे आवश्यक आहे. (कलम ३९)

***वेगवेगळया प्रकारच्या जैविक संसाधनांसाठी संग्रह संस्था नियुक्त करण्याची प्रक्रिया नियमांमध्ये दिलेली आहे.***

**९. बायोडायव्हर्सिटी हेरिटेज साईटस् (बी.एच.एस.) म्हणजे काय ?**

बी.एच.एस. म्हणजे जैवविविधतेचा विशेष वारसा लाभलेली क्षेत्रे, जैवविविधतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण क्षेत्रांबाबत स्थानिक संस्थांशी सल्लामसलत करून राज्य सरकार अशी क्षेत्रे बी.एच.एस. म्हणून घोषित करू शकते. केंद्र सरकारशी सल्लामसलत करून राज्य सरकार अशा क्षेत्रांचे संरक्षण व व्यवस्थापन यासाठी नियम करेल आणि अशा घोषणेमुळे ज्या लोकांचे आर्थिक नुकसान होत असेल त्यांच्यासाठी नुकसानभरपाई किंवा पुनर्वसनाच्या योजना आखेल (कलम ३७).

**१०. वाद/मतभेद मिटविण्याच्या कोणत्या तरतुदी कायद्यामध्ये केलेल्या आहेत.**

एन.बी.ए. व एस.बी.बी. यांच्यामध्ये वाद निर्माण झाल्यास ते केंद्र सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालयातील सचिवांकडे, फॉर्म ५ द्वारा अपील करू शकतात. कोणत्याही दोन एस.बी.बी. यांच्यात वाद निर्माण झाल्यास केंद्र सरकार हा वाद एन.बी.ए. कडे सोपविते (कलम ५०).

कोणत्याही व्यक्तीला एस.बी.बी. किंवा एन.बी.ए. यांनी दिलेला निर्णय मान्य नसल्यास निर्णय कळविल्यापासून तीस दिवसांच्या आत अशी व्यक्ती उच्च न्यायालयात अपील करू शकते (कलम ५२).

**बी.एम.सी. च्या संदर्भात अशी कोणतीही तरतूद केलेली नाही.**

• • •

# जैवविविधता व्यवस्थापन समिती वास्तव आणि प्रश्न

**१. जैवविविधता व्यवस्थापन समिती (बायोडायव्हर्सिटी मॅनेजमेंट कमिटी, बी.एम.सी.) म्हणजे काय ?**

जैविक विविधता कायदा २००२ (बायोडायव्हर्सिटी ॲक्ट, बी.डी.ए.) याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असणाऱ्या संस्थात्मक रचनेचा एक घटक म्हणून प्रत्येक स्थानिक संस्थेने बी.एस.सी. स्थापन करावी असे या कायद्याच्या कलम ४१ मध्ये म्हटले आहे. याबाबत अधिक विस्तृत २००४ सालच्या जैविक विविधता नियमांमध्ये दिलेल्या आहेत.

बी.डी.ए. च्या अंमलबजावणीची जबाबदारी केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयावर सोपविलेली आहे. जैविक संसाधनांचे संवर्धन, वहिवाट तसेच व्यापारी कारणांसाठी वापर यांविषयीचे निर्णय घेण्यासाठी या कायद्याने एका त्रिस्तरीय संस्थात्मक रचनेची तरतूद केलेली आहे. सर्वोच्च स्तरावर चेन्नईतील राष्ट्रीय जैवविविधता ॲथॉरीटी (एन.बी.ए.) आहे. त्याखालोखाल राज्यस्तरीय जैवविविधता बोर्ड (एस.बी.बी.) आहेत. सर्वांत खालच्या (स्थानिक) पातळीवर बी.एम.सी. आहेत.

**२. बी.एम.सी. कोण स्थापन करू शकते ?**

ग्रामीण तसेच शहरी भागात स्थानिक संस्थांनी बी.एम.सी. स्थापन करायची आहे. ग्रामीण भागात ग्रामपंचायती अथवा त्याच प्रकारच्या अन्य संस्थांना (उदा. स्वायत्त जिल्हा समिती, हिल कौन्सिल) स्थानिक संस्था समजले जाते. शहरी भागात नगरपालिकांना स्थानिक संस्था समजले जाते. ज्या भागांमध्ये पंचायती अथवा पालिका दोन्हीही नाहीत अशा ठिकाणी संविधानाने नमूद केलेल्या तसेच कायदेशीररित्या स्थापन केलेल्या स्वयंशासनाच्या कोणत्याही संस्थांना स्थानिक संस्था समजले जाते.

**३. स्थानिक संस्थांनी बी.एम.सी. स्थापण्यास नकार दिल्यास काय होऊ शकते ?**

या कायद्यामध्ये अशा परिस्थितीचा विचार केलेला नाही. बी.एम.सी. स्थापन करणे सक्तीचे आहे (कलम ४१.१ तसेच नियम २२.१). मात्र घटनात्मक तरतुदींच्या आधारावर स्थानिक संस्थांना स्वयंशासनाविषयीचा अधिकार म्हणून बी.एम.सी. स्थापन करण्यास नकार देण्यासाठी वाव असू शकेल.

**४. बी.एम.सी. ची संरचना कशी असावी ?**

बी.एम.सी. मध्ये एक अध्यक्ष आणि स्थानिक संस्थेने शिफारस केलेले कमाल सहा सदस्य असावेत. शिफारस केलेल्या एकूण सदस्य संस्थेच्या किमान एक तृतीयांश महिला असाव्यात व किमान १८% सदस्य अनुसूचित जाती/जमातींचे असावेत.

अध्यक्षांची निवड बी.एम.सी. च्या सदस्यांमधून केली जावी (नियम २२.२ आणि २२.३).

**५. ज्या राज्यात एस.बी.बी. नाही अशा राज्यात बी.एम.सी. स्थापन केल्या जाऊ शकतात का ?**

बी.डी.ए. अनुसार बी.एम.सी. ही स्थानिक संस्थेने स्थापन करावयाची असून तिची स्थापना व कार्य हे एस.बी.बी. च्या अस्तित्वावर अवलंबून नाही.

**६. बी.एम.सी. चे कार्य काय ?**

जैवविविधतेचे संवर्धन, शाश्वत वापर आणि नोंदणीच्या दृष्टीने बी.डी.ए. ने बी.एम.सी. ला व्यापक अधिकार दिलेले आहेत. यामध्ये अधिवास, भूप्रकार यांचे संरक्षण तसेच स्थानिक पीकप्रकार, स्थानिक पाळीव जनावरांच्या प्रजाती व सूक्ष्म जीवांचे संगोपन यांचा समावेश होतो. जैविक संसाधनांची तसेच संबंधित परंपरागत ज्ञानाची नोंद ठेवणेही बी.एम.सी. वर बंधनकारक आहे (कलम ४१.१).

असे असूनही जैवविविधता कायद्याअंतर्गत बनविलेले नियम (नियम २२) हे बी.एम.सी. चे कार्य केवळ पी.बी.आर. बनविण्यापुरते मर्यादित ठेवतात. सदर बी.एम.सी. ना एस.बी.बी. मार्गदर्शन करतील. पी.बी.आर. मध्ये स्थानिक जैविक संसाधनांची उपलब्धता व संलग्न ज्ञान, त्यांचा औषधी उपयोग व त्यासंबंधीचे पारंपरिक ज्ञान याविषयी संपूर्ण माहिती असली पाहिजे (नियम २२.६). बी.एम.सी. ने स्थानिक वैदूंद्वारा केल्या जाणाऱ्या जैविक संसाधनांच्या वापराविषयीच्याही नोंदी ठेवणे गरजेचे आहे. (नियम २२.७)

बी.एम.सी. ने एन.बी.ए. व एस.बी.बी. यांना त्यांच्या आवश्यकतेनुसार सल्ला द्यावा. असे नियमांमध्ये नमूद केले आहे (नियम २२.७). याचा अर्थ असा की बी.एम.सी. स्वत: पुढाकार घेऊन एस.बी.बी. वा एन.बी.ए. ला सल्ला देऊ शकत नाही, तर त्या संस्थांनी विचारल्यानंतरच सूचना करू शकते. तसेच, अंतिम निर्णय या सल्ल्याप्रमाणे घेण्यास उच्चाधिकार समित्या बांधील नाहीत.

पी.बी.आर. व्यतिरिक्त आणखी एक नोंदवही बी.एम.सी. ला ठेवावी लागेल, (नियम २२.११) यामध्ये जैविक संसाधनांची वहिवाट, दिले गेलेले अधिकार, पारंपरिक ज्ञान, त्यासाठी गोळा केलेल्या शुल्काच्या नोंदी, फायद्यांच्या वाटपाविषयी माहिती तसेच फायद्यांच्या वाटपाच्या पद्धती याविषयीच्या संपूर्ण माहितीचा समावेश असावा.

परंतु जैविक संसाधनांचा अधिकार ठरविणाऱ्या व मान्य करणाऱ्या एन.बी.ए. किंवा एस.बी.बी. कडून बी.एस.सी. कडे ही माहिती कशी पोहोचेल याचे मार्गदर्शन कायद्यात करण्यात आलेले नाही. तसेच बी.डी.ए. किंवा नियमांमध्ये बी.एस.सी. च्या संवर्धनविषयक कार्याची सविस्तर माहिती देण्यात आलेली नाही.

**७. राष्ट्रीय व राज्यपातळीवर बी.एम.सी.ची स्थापना करण्याविषयी काही मार्गदर्शन करण्यात आले आहे का ?**

ऑगस्ट २००८ पर्यंत उपलब्ध माहितीनुसार बी.एम.सी.ची स्थापना करण्याविषयी असे मार्गदर्शन वा प्राथमिक तत्वे कोठेही दिलेली नाहीत.

## ८. पी. बी. आर. तयार करण्याचे काय परिणाम होतील ?

जैविक संसाधनांच्या नोंदी ठेवणे हे काही स्थानिक समूहांसाठी संपूर्णत: अपरिचित वा निरूपयोगी काम नाही. शतकानुशतके स्थानिक समुदाय जैविक संसाधनांची उपलब्धता व त्यासंबंधीचे पारंपरिक ज्ञान लिखित, मौखिक वा अन्य सांस्कृतिक स्वरूपांत जतन करीत आलेच आहेत. सदर पी.बी.आर. पद्धत अधिकृत कामासाठी मोठ्या प्रमाणावर माहितीचा वापर करण्याच्या उद्देशाने एन.बी.ए. च्या 'अधिकृत जन जैवविविधता नोंदवही' (पी.बी.आर.) पूर्वनियोजित आराखडे पुरवते. जैवविविधता व्यवस्थापन समितीने संशोधक व विद्यार्थ्यांच्या सहकार्याने तसेच शास्त्रज्ञांच्या अनुमोदनाने हे आराखडे भरायचे आहेत. ही माहिती पुढे संगणकीकृत करून भारतीय जैवविविधता माहिती प्रणालीत (इंडीयन बायोडायव्हर्सिटी इन्फॉर्मेशन सिस्टिम, आय.बी.आय.एस.) ठेवली जाईल.

बी.एम.सी. ही पी.बी.आर. ची एकमेव ताबेदार असेल वा इतर कोणालाही हे अधिकार असतील हे आजमितीस स्पष्ट नाही. बी.एम.सी. ने पी.बी.आर. ठेवाव्यात व अधिकृत कराव्यात असे नियमांमध्ये म्हटले असेल (नियम २०.१०), तरीही याविषयीची कार्यप्रणाली उपलब्ध नाही. जन जैवविविधता नोंदवहीमध्ये नोंदवल्या गेलेल्या ज्ञानाचा गैरवापर वा अप्रस्तुत सादरीकरण होऊ नये यासाठी कोणतेही कायदेशीर संरक्षण नाही. तसेच पी. बी. आर. मधील माहिती एकदा आय.बी.आय.एस. मध्ये गेली की ती बी.एम.सी. व स्थानिक समुदायांना सहजरित्या उपलब्ध राहणार नाही.

बी.एम.सी. प्रथापित करण्यासाठी पुरेसे संरचनात्मक पाठबळ नसताना, तसेच नोंदवल्या गेलेल्या ज्ञानाच्या सुरक्षेची हमी नसताना, देशभर पी.बी.आर. निर्मितीचे काम सुरू करण्याच्या उपक्रमामध्ये काही धोका असू शकतो. पी.बी.आर. मध्ये एकदा नोंदवली गेलेली माहिती स्थानिक समूहांतील लोकांना बाहेरील लोकांच्या मदतीविना सहज उपलब्ध होणार नाही, हे स्पष्टच आहे.

## ९. बी.एम.सी. ला त्यांच्या परिसरातील जैविक संसाधनांच्या वापरासाठी कोणाला परवानगी देण्याचा किंवा नाकारण्याचा अधीकार आहे का?

नाही. संशोधन, व्यावसायिक विनियोग वा पेटंट, भौगोलिक प्रमाणक यांसारख्या बौद्धिक संपदा अधिकारांसाठी (इंटलेक्चुअल प्रॉपर्टी राइटस्, आय.पी.आर.) जैविक संसाधनांचा वापर करण्यास कोणाला मान्यता देण्याचे वा नाकारण्याविषयीचे अधिकार बी.एम.सी. ला देण्यात आलेले नाहीत. विदेशी व्यक्ती/संस्थेला परवानगी देण्याचे अधिकार एन.बी.ए. च्या आधीन असून अशी परवानगी देण्यापूर्वी एन.बी.ए. ने संबंधित बी.एम.सी. शी ''सल्लामसलत'' करणे सक्तीचे आहे (कलम ४१.२). भारतीय व्यक्ती/संस्थेने अशा वापरापूर्वी एस.बी.बी. ला केवळ पूर्वसूचना देणे आवश्यक आहे. एस.बी.बी. ने संसाधनांच्या वापराच्या शर्ती लागू करण्यापूर्वी बी.एम.सी. शी ''सल्लामसलत'' करणे सक्तीचे आहे (कलम २४.१, २४.२ आणि ४१.२).

## १० ''सल्लामसलत'' म्हणजे काय ?

एन.बी.ए. तसेच एस.बी.बी. यांनी बी.एम.सी.

शी सल्लामसलत करणे सक्तीचे असले, तरीही सदर समितीचा सल्ला मानणे त्यांच्यांवर बंधनकारक नाही. बी.एम.सी. च्या मताला अधिक वजन मिळावे, म्हणून 'सल्लामसलत' या शब्दाची व्याख्या काही राज्यांच्या नियमावलीत (उदा. मध्य प्रदेश, सिक्कीम) करून त्यात पूर्वसूचना व पूर्वमान्यतेचा समावेश करण्यात आला आहे. परंतु राज्यस्तरीय नियम हे केवळ त्या राज्याच्या एस.बी.बी. लाच लागू होतात; ते एन.बी.ए. ला लागू होत नाहीत.

**११. बी.एम.सी. स्थापन झालेली नसल्यास सल्लामसलत प्रक्रिया होऊ शकते काय ?**

सद्य:स्थितीत, अनेक ठिकाणी बी.एम.सी. स्थापन झालेल्या नसतानाही एन.बी.ए. अर्जाला मान्यता देते. कायद्यामध्ये वा नियमांमध्ये, अशी परवानगी रोखू शकणारी कोणतीही तरतूद नाही.

**१२. जैविक संसाधनांच्या वापरासाठी परवानगी देताना बी.एम.सी. काही शुल्क आकारू शकते का?**

आपल्या क्षेत्रातून व्यवसायिक कारणांसाठी जैविक संसाधनांचा वापर वा विनियोग कोणाला करायचा असल्यास बी.एम.सी. काही शुल्क आकारू शकते (कलम ४१.३). विदेशी संस्था/व्यक्तींकडून व अनिवासी भारतीयांकडून व्यावसायिक कारणांसाठी जैविक संसाधनांचा वापर वा विनियोग करण्यापूर्वी एन.बी.ए. ची पूर्वमान्यता घेण्याची आवश्यकता आहे. या मान्यतेनंतर बी.एम.सी. शुल्क आकारू शकते.

**१३. कोणत्या आधारावर शुल्क आकारणी केली जाईल, हे कोण ठरवणार ?**

ज्या विदेशी व्यक्ती/संस्था व अनिवासी भारतीयांनी जैविक संसाधने व पारंपरिक ज्ञानाचा व्यावसायिक विनियोग करण्याविषयी एन.बी.ए. ची पूर्वमान्यता घेतली आहे. त्यांच्या बाबतीत एन.बी.ए. नफ्याची हिस्सेदारी व पद्धत ठरवते. यामध्ये आर्थिक तसेच प्रक्रियेसंबंधीच्या शेतीचाही समावेश होतो (कलम २१.२). यासाठी एन.बी.ए. ने एक करारनाम्याचा मसुदा तयार केलेला आहे, जो प्रत्येक नव्या अर्जाच्या संबंधात गरजेप्रमाणे बदल करून वापरला जातो. सदर मसुद्याप्रमाणे केलेल्या करारनाम्यावर अर्जदार तसेच एन.बी.ए. यांना सह्या कराव्या लागतात. भारतीयांनी जैविक संसाधनांचा तसेच संबंधित ज्ञानाचा व्यावसायिक कामासाठी वापर केल्यास, कोणत्या आधारावर बी.एम.सी. शुल्क आकारू शकते, हे कायद्यात नमूद केलेले नाही.

**१४. जमा झालेल्या 'स्थानिक जैवविविधता निधी' (लोकल बायोडायव्हर्सिटी फंड, एल.बी.एफ.) चे काय करायचे हा निर्णय कोण घेते ?**

जिथे स्वयंशासनाची शासनमान्य संस्था कार्यरत आहे अशा, राज्य शासनाने घोषित केलेल्या प्रत्येक भागात/प्रदेशात एल.बी.एफ. तयार करायचा आहे (कलम ४३). राज्य शासन, एस.बी.बी. तसेच एन.बी.ए. यांच्याकडून प्राप्त झालेले अनुदान आणि स्थानिक पातळीवर बी.एम.सी. ने आकारलेले शुल्क मिळून एल.बी.एफ. उभारला जातो.

सदर निधीच्या व्यवस्थापनाबाबतचे निर्णय कसे घ्यावेत याबाबतच्या सूचना राज्य शासनाने द्यायच्या

आहेत (कलम ४४.१). हा निधी स्थानिक समितीच्या आखत्यारीत येणाऱ्या भागातील जैवविविधता संवर्धन तसेच संगोपनासाठी वापरायचा आहे. तो स्थानीय समाजाच्या निसर्ग–संवर्धन–सुसंगत उद्दिष्टांसाठी सुद्धा वापरला जाऊ शकतो (कलम ४४.२).

**१४. एल.बी.एफ. चे नियंत्रण आणि लेखापरीक्षण कसे केले जाते ?**

एल.बी.एफ. ज्याच्या ताब्यात आहे अशा व्यक्तीला प्रत्येक आर्थिक वर्षासाठी वार्षिक अहवाल तयार करावा लागतो. त्यामध्ये मागील आर्थिक वर्षात झालेल्या सर्व उलाढालींचा लेखाजोखा द्यावा लागतो. याच व्यक्तीने वर्षभरातील आर्थिक व्यवहारांचा हिशोब ठेवून आर्थिक वर्षाच्या शेवटी, राज्याच्या 'अकाउंटंट जनरल' च्या सूचनांनुसार लेखापरीक्षण करून घ्यावे लागते. सदर व्यक्तीला वार्षिक अहवाल, लेखापरीक्षणाचा अहवाल तसेच लेखापरीक्षण झालेले ताळेबंद स्थानिक संस्थेला सादर करावे लागतात. सदर स्थानिक संस्थेला (उदा. पंचायत, पालिका इ.) जिल्हा मॅजिस्ट्रेटकडे हे अहवाल सादर करावे लागतात (कलम ४५, ४६ व ४७).

**१६. जैवविविधता व्यवस्थापनातून होणाऱ्या फायद्यांच्या वाटणीबद्दल बी.डी.ए. कोणते पर्याय समोर मांडतो ? या बाबतीत बी.एम.सी. ला काही मताधिकार आहेत काय ?**

स्थानिक समूहाच्या ताब्यात असलेली संसाधने अथवा पारंपरिक ज्ञान वापरून जेव्हा एखादी परकीय देशी व्यक्ती / संस्था नफा मिळवते तेव्हा जैवविविधतेपासून मिळणाऱ्या फायद्याच्या वाटणीचा प्रश्न येतो. असा फायदा झाल्यास त्याच्या वाटणीसंबंधीच्या निर्णयासाठी व्यवस्था तयार करावी लागेल.

अर्जदार व एन.बी.ए. किंवा फायद्याचे इतर कोणतेही मान्यताप्राप्त भागीदार यांचे संयुक्त आय.पी.आर. (उदा. पेटंट, भौगोलिक, प्रमाणक इ.) असणे ही फायद्याची वाटणी करण्याची एक पद्धत आहे. 'फायद्याच्या भागीदारी' मध्ये एक वा अधिक बी.एम.सी./ गावे यांचा समावेश होऊ शकतो. तसेच फायद्याच्या वाटपामध्ये शास्त्रज्ञ, अर्जदार व फायद्याचे अन्य वाटेकरी यांमध्ये एकत्रित स्वरूपात भांडवली निधीचा वापर करण्याचेही प्रयत्न केले जाऊ शकतात. सदर भांडवली निधी, संशोधन, संयुक्त सर्वेक्षण अशा कामांसाठी वापरता येऊ शकतो.

जैवविविधता व्यवस्थापनातून मिळणारे आर्थिक तसेच आर्थिकेतर असे दोन्ही प्रकारचे फायदे एन.बी.ए. ला मान्य असलेल्या अशा कोणत्याही भागीदारांना देण्यात येतील.

बी.एम.सी. तसेच स्थानिक समूहांना फायद्याचे भागीदार वा फायद्याच्या वाटपाची सूत्रे ठरवण्याच्या कामात कोणतीही भूमिका नाही. हे काम एन.बी.ए. च्या आखत्यारीत येते.

सध्याच्या कायदेशीर तरतुदींनुसार फायद्याचा बहुतांश हिस्सा हा 'नॅशनल बायोडायव्हर्सिटी फंड' मध्ये जमा होतो (कलम २१.३).

**१७. स्थानिक समुदायाच्या सदस्याला त्याच्या उपजिविकेवर एन.बी.ए. अथवा एस.बी.बी. ने दिलेल्या मान्यतेचा परिणाम होतो अथवा नाही,**

**हे कसे समजेल ? बी.एस.सी. मान्यताप्राप्त प्रस्तावांची नोंद ठेवेल काय ?**

एन.बी.ए. ने मंजूर केलेला प्रत्येक प्रस्ताव हा सार्वजनिक माहितीचा भाग आहे, असे मानले जाते. परंतु वस्तुस्थितीत एन.बी.ए. च्या संकेत स्थळावर अत्यंत त्रोटक माहिती उपलब्ध असते. पारदर्शक व्यवहाराच्या दृष्टीकोनातून पाहिल्यास ही माहिती पुरेशी नाही.

कायद्याची योग्य अंमलबजावणी करायची झाल्यास , संसाधनांच्या वापरासाठीच्या प्रत्येक मान्यतेपूर्वी एन.बी.ए. ही बी.एम.सी. शी सल्लामसलत करेल व त्यामुळे बी.एम.सी. ला मिळालेली माहिती स्थानिक समुदायापर्यंत पोहोचेल. बी.एम.सी. या सर्व माहितीची नोंद ठेवेल (पहा : प्रश्न क्र. ६)

**१८. नफ्याच्या हिस्सेदारीविषयी अथवा प्रस्ताव मान्यतेविषयी वाद उभा राहिल्यास काय ? एस.बी.बी. अथवा एन.बी.ए. च्या मताशी बी.एम.सी. सहमत नसल्यास काय ?**

कायद्यानुसार बी.एम.सी. ला कोणालाही जैविक ज्ञान किंवा संसाधनांचा वापर वा विनियोग करण्यापासून रोखण्याचा अधिकार नाही, एस.बी.बी. वा एन.बी.ए. च्या निर्णयाविरूद्ध दाद मागण्यासाठी या कायद्याने वा नियमांनी कोणतेही विशेष व्यासपीठ बी.एम.सी. ला उपलब्ध करून दिलेले नाही. देशाच्या अन्य कोणाही नागरीकाला उपलब्ध असणाऱ्या व्यासपीठांवरच बी.एम.सी. याबाबत दाद मागू शकते.

एन.बी.ए. वा एस.बी.बी. च्या निर्णयाविरूद्ध दाद मागायची झाल्यास प्रस्तावाला मंजुरी मिळाल्याची अधिकृत माहिती मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत, बी.एम.सी. उच्च न्यायालयाकडे दाद मागू शकते (कलम ५२).

**१९. एक बी.एम. सी. दुसऱ्या बी.एम.सी. च्या मान्यताविषयक वा शुल्कविषयक निर्णयाच्या विरूद्ध कोणापाशी दाद मागू शकते ?**

अशी दाद मागण्यासाठी कोणतीही संरचनात्मक व्यवस्था या कायद्याप्रमाणे आज उपलब्ध नाही.

**२०. सध्या अस्तित्वात असणाऱ्या विविध समिती (जसे ग्राम वनसमिती, पर्यावरण विकास समिती) व बी.एम.सी. यांमध्ये परस्परसंबंध कशा प्रकारचे असतील ?**

हा कायदा अथवा राष्ट्रीय स्तरावरील नियम यांत कोठेही बी.एम.सी. व शहर / खेड्यातील अन्य गट यांमध्ये परस्परसंबंध कसे असावेत याविषयी कोणतीही तरतूद आढळत नाही. काही राज्यांच्या नियमांनुसार (मध्य प्रदेश, सिक्कीम) स्थानिक प्रशासन संस्थेला बी.एम.सी. च्या जबाबदाऱ्या, या सध्या अस्तित्वात असणाऱ्या अन्य कोणत्याही समितीद्वारे पार पाडता येतील असे वाटल्यास, ती तसे करू शकते. अशा परिस्थितीत वन समिती वा पर्यावरण विकास समिती किंवा संपूर्ण ग्रामसभाच बी.एम.सी. च्या जबाबदाऱ्या पार पाडेल.

**२१. 'जैवविविधता वारसा स्थळे' (बायोडायव्हर्सिटी हेरिटेज साइटस, बी.एच.एस.) घोषित करण्यामध्ये बी.एम.सी. ला काही भूमिका आहे का ?**

स्थानिक गटांशी चर्चा करून 'जैवविविधता वारसा स्थळे' राज्य सरकारने घोषित करावयाची आहेत (कलम ३७). या कार्यात स्थानिक गटांनी बी.एम.सी. बरोबर कसे सहकार्य करावे यासंबंधी ऑगस्ट २००८ मध्ये मिळत असलेल्या माहितीनुसार कोणतेही मार्गदर्शन उपलब्ध नाही.

**२२. जैविक चोरीच्या (बायोपायरसी) घटनांमध्ये बी.एम.सी. काय करू शकते ?**

एखाद्या जनसमूहाने पारंपरिक ज्ञान वा जैविक संसाधने यांचा जर गैरवापर केला किंवा स्थानिक समूहाशी चर्चेविना व त्यांना फायद्यामध्ये वाटणी दिल्याशिवायच संसाधनांचे व्यापरीकरण करण्यात आले, तर बी.एम.सी. काय करू शकते, याविषयी कायद्यामध्ये वा नियमांमध्ये कोणतीही तरतूद आढळत नाही. बी.एम.सी. अशा घटनांमध्ये एस.बी.बी. अथवा एन.बी.ए. कडे दाद मागू शकते असे गृहीत धरता येईल, मात्र कायद्यात वा नियमांत त्यासंबंधी कोणताही उल्लेख नाही.

(ह्या माहितीचे एकत्रीकरण कल्पवृक्ष व ग्रेन या संस्थांच्या सहयोगाने करण्यात आले आहे.)

• • •

## 'मंथन' चर्चासत्रातील सहभागी मान्यवर व्यक्ती व संस्था

१) श्री. जनार्दन महाराज वळवी, नंदूरबार
२) डॉ. रजनीकांत आरोळे, जामखेड
३) प्रा. शरद कुलकर्णी, पुणे
४) प्रा. रा. के. मुटाटकर, पुणे
५) श्री. गिरीश सोहोनी, बाएफ, पुणे
६) ॲड. सुरेखा दळवी, पेण
७) श्रीमती नॅन्सी गायकवाड, कर्जत
८) श्री. मोहन हिराबाई हिरालाल, गडचिरोली
९) श्रीमती उल्का महाजन, पेण
१०) डॉ. हेमंत आपटे, पुणे
११) श्रीमती वसुधा सरदार, पुणे
१२) श्रीमती सौदामिनी राव, पुणे
१३) डॉ. मिलींद बोकील, पुणे
१४) श्री. अरविंद रेड्डी 'एनकॅश' संस्थेचे प्रतिनिधी, पुणे
१५) दिपक झाडे, 'वॉटर रोड' चे प्रतिनिधी, पुणे
१७) 'नवम' संस्थेचे प्रतिनिधी, पुणे
१८) इकोनेट संस्थेचे प्रतिनिधी, पुणे
१९) श्रीमती निरुपमा देशपांडे, धारणी
२०) श्री. बाबा गणोरकर, धारणी
२१) श्री. लसासू नरोटे, धारणी
२२) श्री. ग. शां. पंडित, पुणे
२३) डॉ. पु. सू. आगाशे, पुणे
२४) डॉ. अभय कुदळे, पुणे
२५) श्री. जयवंत मंत्री, पुणे
२६) डॉ. शैलेश दळवी, पुणे
२७) श्री. सज्जू जोसेफ, पुणे
२८) डॉ. अनिल सराफ, बाएफ, पुणे
२९) श्रीमती शिल्पा करवंदे, पुणे
३०) श्रीमती विदुला पुरोहित, पुणे
३१) 'मास' चे कार्यकर्ते
३२) 'बायफ' चे कार्यकर्ते

# आदिवासी एक निसर्गमय मानव

**डॉ. मोतीराम रावजी देशमुख**

आदिवासी आणि निसर्ग यांच्यात पूर्वंपार अतूट संबंध आहे. प्राचीन काळापासून ते डोंगरदऱ्यांत आणि जंगलाच्या आश्रयाने राहात आहेत. आजही त्यांचे वनाशी घट्ट नाते आहे. त्यामुळेच आदिवासी आणि वनवासी असे समीकरण तयार झाले आहे. वनवासी म्हणजे वनात राहणारे, वनांशी एकरुप झालेले, वनाला सर्वस्व मानणारे भारतभूमीवर निरतीशय प्रेम करणारे आणि मातृभूमीविषयी असीम श्रध्दा बाळगणाऱ्या या आदिवासींना काही जण 'वनवासी' म्हणतात. ही संज्ञा आदिवासींचे वनाशी असलेल्या घट्ट नात्याचे दर्शक आहे.

रामाप्रमाणे वनवासाला पाठविलेल्या जमाती असा वनवासी या संज्ञेचा अर्थ मुळीच नाही. सखल भूप्रदेश, नगरात राहणाऱ्या जाती-जमातीपेक्षा या आदिवासींची निसर्गाच्या सानिध्यात असणारी जीवन रहाटी, संस्कृती वेगळी आहे.

आदिवासी हे स्वत:ला वनापासून आणि निसर्गापासून वेगळे समजत नाहीत. वनाशी आणि निसर्गाशी एकरुप असे जीवन ते जगतात. निसर्गाचेच एक घटक म्हणून राहातात. वन आणि तेथे राहणारे आदिवासी यांचे नाते परस्परावलंबी आणि परस्पराश्रयी आहे. कोकणा, वारली, कातकरी, महादेव कोळी आदी अदिवासी जमातीचे लोक आजही जंगलातील पालेभाज्या व फळभाज्या आवडीने आहारात वापरतात. झाडपाला, कंदमुळे ते खातात. लग्न सोहळा, सण-उत्सव, तमाशा, भोवाडा याप्रसंगी होणाऱ्या नकला, नाचगाण्यात पुरुष डोळे, कमरेभोवनी झाडपाला गुंडाळून तर महिला रंगीबेरंगी फुलांच्या भाष, हाडे, गवत, लाकडाच्या मण्यांपासून तयार केलेल्या माळा, विविध पक्षांची पिसे डोक्याला लावून नाचगाणी करतात.

आजारी पडल्यानंतर दवाखान्यातील डॉक्टरांनी दिलेल्या गोळ्या-औषधांपेक्षा त्यांचा वैदू-भगत पुजाऱ्याने दिलेली जडीबूट्टी ते श्रध्दापूर्वक आणि विश्वासाने खातात/पितात. या औषधांचा हमखासपणे गुण येतो यावर त्यांचा विश्वास आहे. तशी त्यांची धारणा आहे. घरासमोर आजही ते आवडीने एकतरी फुलझाड, फळझाड लावतात. निसर्गाच्या सान्निध्यात सर्वाधिक वेळ राहणे ते पसंत करतात. निसर्गाशी असलेली एकरुपता यातून लक्षात येते.

थोडक्यात वनाशी, निसर्गाशी आदिवासी जमातीचे लोक इतके एकरुप झालेले आहेत की, त्याच्याशिवाय जणू त्यांचे अस्तित्वच संभवत नाही. निसर्ग, पर्यावरणाशी असलेल्या एकजीव एकरुपतेमुळेच त्यांची एकूण जीवनशैली आणि संस्कृती ही नद्यांच्या खोऱ्यात तसेच सुपीक भूप्रदेशात राहणाऱ्या ग्रामीण, नागरी भागापेक्षा निश्चितपणे वेगळी आहे. हे नव्याने सांगायला नको.

वर नमूद आदिवासी जमातींमध्ये प्रचलित असलेल्या कणसरी कथा, डोंगरीदेव कथा, बडादेव कथा, ब्रह्मदेव कथा, डहाक कथा, थाळगाणे कथा आदी लोककथा तसेच उदाहरणादाखल खाली नमूद

काही लोकगीतांवरुन आदिवासी आणि निसर्ग यांच्यातील संबंध उलगडण्यास नक्कीच मदत होते.

*संबंध उलगडण्यास नक्कीच मदत होते.*
*पिपळावानी खळाळजो,*
*हारळीवानी येली जायजो,*
*कापसावानी ढवळा हायजो,*
*शिदाचा डाहाळा कमरल खासजो,*
*सरकार करजो, दरबार करजो,*
*खोटा पैसा चालवजो नोको*

आदिवासी जमातींमध्ये इतरांप्रमाणेच संस्कारांना महत्त्व आहे. इतर संस्कारांपैकी जावूळ (जावळ) हा एक महत्त्वाचा संस्कार कोकणा, वारली जमातीत सुईन सकाळीच बाळाला न्हाऊ घालते. मामा बाळाच्या डोक्यावरचे पहिले केस काढतो. बाळाला नवीन कपडे घातले जातात. पिंपळाची पाने, हरळी आणि कापूस यांपासून तयार केलेली टोपी बाळाला घातली जाते. बाळाची विधीवत पूजा केली जाते. यावेळी सुईन काश्य/पितळाचे ताटावर नाण्याने (रुपया) नाद करीत वरील गीत गाते.

खळाळणाऱ्या पिंपळाप्रमाणे हसत, आनंदाने जीवन जग हरळी घट्टपणे सर्वत्र पसरते तसा तू आपल्या कामाने/गुणाने नाव उज्वल कर. आणि कापसासारख्या पांढऱ्या फट्ट होईपर्यंत जग म्हणजेच दीर्घायुष्य लाभो असा शुभाशीर्वाद सुईन यावेळी देते. बालकाला निसर्गाकडून, वनस्पतींकडून घ्यावयाचे चांगले गुण/ मुल्यांची शिकवण यावेळी ती देते. अन्य जमातींमध्ये असे संस्कार, मूल्यांचे धडे बालपणीच मुलांना क्वचितच दिले जात असतील. आदिवासींचे जीवनात निसर्गाला असलेले महत्त्वाची प्रचिती या लोकगीतावरुन येते.

*लिंबा तुजे झाडावर, लावळा बोल काई,*
*चिमणीस बोल बाई, सासरा आला काई.*

घरासमोर येऊन कावळा विशिष्ट आवाजात ओरडला की, पाहुणे येणार असा समज काही आदिवासी जमातींमध्ये रुढ आहे. कावळ्याचा विशिष्ट आवाज हा पाहुणे येण्याचा संकेत ते आजही मानतात.

'दारी आहे ताड वं माड, तेवर चड गोरी वं नार,
काय वं गोरी चडलीस, मी त पाहां मुराळी वाट.'

वर्षातील विशिष्ट सण, उत्सव, यात्रा, एखादा कार्यक्रम असला की, सासुरवाशीण माहेरी जाण्यास उतावीळ होते. तिचे संपूर्ण लक्ष माहेरच्या वाटेकडे मुराळी येणाऱ्या माणसाकडे लागलेले असते. माहेरी जाण्यासाठी उतावीळ झालेली एक तरुणी चक्क माडांच्या झाडावर चढून माहेरच्या माणसांचा ठाव घेते.

*सावर फुलली, वारेनी डुळली,*
*उषा तुजा पेनं भरला,*
*माजा आनंद, आईचे डोळ्यात पाणी.*

सावर नावाच्या झाडाचा बहराचा हंगाम आणि कोकणा जमातींचा पेनं (मागण) लग्न यांच्या धुमधडाक्याचा हंगाम एकच सावरीचा बहर व पेन, लग्न या संस्कार सोहळ्याचा हंगाम या निसर्गचक्रातील घटनांची येथे घातलेली सांगड मोठी मार्मिक आहे.

*रामदास जावू नको रे आजूबाजू,*
*डोंगरी लावलेत काजू*

शासकीय फळबाग लागवड योजनेचा लाभ गेल्या दशकापासून आदिवासी घेऊ लागलेत. विविध फळझाडांपैकी काजू झाडाची लागवड आदिवासी करु लागलेत याचा प्रयत्न या लोकगीतावरुन येतो.

वर उदाहरणादाखल दिलेल्या नमूनेदार लोकगीतांवरुन आदिवासी आणि निसर्ग यांच्यातील संबंध ध्यानात येण्यास मदत होते.

'आदिवासींनीच जंगले संपविली' असा आरोप सध्या त्यांच्यावर इतरांकडून केला जातो आहे; परंतु तो चुकीचा आहे. जंगलांच्या माहिती विषयी अभ्यासक के . जैन म्हणतात, ''वने मातृदेवतेची निवासस्थाने मानली जातात. मी देवभूमी असते. अशा समजुती परंपरेने चालत आलेल्या आहेत. त्यामुळेच ते वनांना पवित्र मानतात. त्यांना हानी पोहचविण्याला ते पाप समजतात. मानवाच्या शिकारी अवस्थेपासून या वनांचे पवित्र वने म्हणून संरक्षण, संवर्धन झाले आहे. पूर्वेत्तर भारतातील गारो आणि खासी या आदिवासी जमातींचे लोक त्यांच्या पवित्र मानल्या गेलेल्या वनात कुणालाही प्रवेश करु देत नाहीत. हानी पोहोचविणे तर दूरच-तेथील पशूपक्षांची हत्या देखील करु देत नाही. मध्य प्रदेशातील गोंड वृक्ष तोडीला गुन्हा मानतात. वृक्ष तोडणे त्यांच्या दृष्टीने पापकृत्य असते. देशातील विविध आदिवासी जमातींमध्ये जंगल तसेच पशूपक्षांना असलेले महत्त्वच यातून स्पष्ट होते.

महाराष्ट्रातील कोकणा आणि वारली जमातीत पिंपळ, पायर, पळस, वड, कविसा, सावर, उंबर शीद (शमी), बेल इत्यादी देववृक्ष समजली जाणारी झाडे ते राखून ठेवतात. या आणि इतर फळझाडांवर त्यांची जीविका चालते. तसेच 'वनौषधी' झाडाझुडपांवर त्यांचे दीर्घायुषच अवलंबून असल्याने ते अशा झाडांची तोड करीत नाहीत; की त्याचे लाकूड सुध्दा चुलीत लावत नाहीत.

'वाघदेव' ही 'कोकणा' जमातीची रक्षकदेवता आहे. वाघदेव ज्या परिसरात असतो त्या परिसरातील झाडे, झुडपे तोडू नये असा संकेत या जमातीमध्ये आहे. आणि ते तो पाळतात. त्यामुळेच 'वाघदेवाच्या' परिसरात आगदी दाट जंगल (झाडी) बघायला मिळते. प्राणीपूजा व निसर्गपूजा या आदिवासींच्या पारंपरिक सांस्कृतिक जीवणाचे अंग आहेत. आदिवासींच्या समजुती त्यांच्यात प्रचलित असलेल्या रुढी आणि त्यांचे परंपरेने चालत आलेले आचार यांचे स्वरुप पाहिले तर झाडे, पशूपक्षी, नद्या, तळी, डोंगर इत्यादी संबंधी त्यांच्या मनात वसलेल्या श्रध्दा भावांचे दर्शन घडते. त्यामुळेच ते त्या देवनिर्मित वनांतील वृक्षांना आपल्याकडून इजा पोहचू नये याची दक्षता येतात. आदिवासांच्या वनांविषयांच्या या भूमिकेमुळेच आजही वने टिकून आहेत.

अलिकडच्या काळात जागतिक पातळीवर पर्यटनाला महत्त्व येत आहे. वनक्षेत्रात दळणवळणांची साधणे, पंचतारांकित हॉटेल, बांधकाम, धरण, व्यापार, उद्योगधंदे या भागात वाढू लागल्याने आदिवासींचे जीवन आणि वनक्षेत्रावरही विपरीत परिणाम होत आहे. आदिवासी आणि निसर्ग यांची ताटातूट करुन त्यांचे भावजीवन आणि कलाजीवन प्रदूषित करण्याचे प्रयत्न सध्या सर्वत्र होत आहेत. यामुळेच त्यांची ग्रामसंस्कृती नष्ट होण्याचा धोका निर्माण झाला आहे. शिवाय प्रदूषणमुक्त असलेल्या या भागात 'प्रदूषणाचा' प्रश्न निर्माण होऊ पाहतो आहे.

डोंगरदऱ्यांतील निसर्गाच्या आश्रयाने राहणाऱ्या आदिवासींचे जीवन नागरी आणि शहरी कृत्रिमतेपासून दूर असून बंधनरहित आहे. मर्यादित गरजांमुळे त्यांच्या जीवनात धावपळ नाही. सभोवताली हिरवीगार झाडी, डोक्यावर निळे आकाश आणि खळखळणारे झरे यांच्या सहवासात राहणारी ही साधीभोळी माणसं,

खेड्यापाड्यांवर, वाड्यावरस्त्यांवर लहानमोठ्या समूहाने राहात असली तरी त्यांचे परस्परांशी घट्ट असे भावनिक नाते असते. जोराच्या वाऱ्याने गदगदून हालविल्यानंतर झाड जसे पूर्वीपेक्षा अधिक आल्हाददायक नि टवटवीत दिसते तसेच गहिऱ्या भावबंधांनी घट्ट बांधलेली ही माणसे हातात हात घालून खळखळून हसमोर समूह जीवन जगतात. व्यक्तिकेंद्रीतता त्यांच्यात नसते. शिवाय शहरी जीवनासारख्या बेगडीपणा तेथे नसतो नि स्वार्थाचा वासदेखील !

बदलती शेती करणाऱ्या कोकणा, वारली, कातकरी, महादेव कोळी या जमाती गेल्या काही पिढ्यांपासून स्थिरावल्या आहेत. पूर्वी शिकार, कंदमुळे, फुलेफळे, झाडपाला यावर गुजरात करणारा सावरीची कात आणि गंतुरीच्या पान विड्याने तोंड रंगवणारे हे आदिवासी अलीकडे काजू, हापूस आंब्याची लागवड करु लागले आहेत. नागली, भाताच्या शेती बरोबर ऊस, भूईमुग, टमाटे, कांदा ही नगदी पिके घेऊ लागले आहेत. शासनाने पशुपक्षी हत्येवर बंदी घातल्याने हरिण, ससा, भेकर, साळींदर, रानडुक्कर, मोरगी, ससाणा, मोर इत्यादी पशुपक्षांची समूहाने शिकार करुन पोटाची भूक भागविणाऱ्या या उपजिविकेच्या साधनांवर यामुळे कायद्याची बंधने आली आहेत.

परंतु असे असले तरी दिवसेंदिवस वनौषधी वनस्पती, झाडे आणि पशूपक्षी यांच्या घटण्याच्या संख्येमुळे इतरांप्रमाणेच 'जंगलचा हा राजाही' चिंतेत आहे. या जाणीवेमुळेच तो 'या' साऱ्यांच्या संरक्षण व संवर्धनासाठी गावपातळीवर 'कुऱ्हाडबंदी, पशूपक्षी हत्याबंदी' या सारखे अभिनव उपक्रम स्वत: पुढाकार घेऊन राबवू लागला आहे. पाण्याशिवाय मासा जिवंत राहू शकत नाही, हे अलीकडच्या काळात खऱ्या अर्थाने उमगल्यानेच नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा, पेठ, दिंडोरी, कळवण, त्र्यंबकेश्वर तालुक्यातील काही गावकऱ्यांनी आपले कर्तव्य समजून असे उपक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे.

मात्र एकट्याटुकट्याचे हे काम नाही. 'एक मूल एक झाड, कुऱ्हाडबंदी, जंगल वाचवाल तर मानवी जीवन वाचवाल' या अभियानात प्रत्येकानेच आपले कर्तव्य समजून भाग घ्यायला हवा. उघड्या-बोडक्या झालेल्या, बनू पाहणाऱ्या टेकड्या, डोंगराप्रमाणे हा देश उघडा नागडा होण्यास फारसा अवधी लागणार नाही. आज पैसा आणि सुखाच्या मागे धावणाऱ्या सुजानांनी एक सत्य ध्यानात घ्यायला हवे, या देशाची पवित्र संस्कृती ही जंगलावून जन्माला आली, तेथेच विकसित झाली आणि जंगलाच्या आश्रयानेच स्थिरवलेली आहे. जंगलाच्या आश्रयामुळे ती जिवंत आहे. आजच्या या हपापलेल्या जमान्यात जंगला बरोबर संस्कृती लोप पावली तर, एकूणच माणवी जीवन शुष्क बनेल ! हे सुजाणांस नव्याने सांगायला नको ! म्हणूनच काळाची पावले ओळखून प्रत्येकानेच आपले कर्तव्य समजून निसर्गमय आदिवासी प्रमाणेच निसर्गावर प्रेम करायला हवे. त्यांचे संरक्षण, आणि संवर्धन करायला हवे. यातच अवघ्या मानव जातीचे कल्याण सामावलेले आहे, हे आपण विसरता कामा नये.

• • •